# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ३८ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६९**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष तिसरे / अंक ६ / मे २००३

## संपादकीय

### उपेक्षित धन

अनेक महत्वाच्या ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यांना नसणारी सूची ही मराठी ग्रंथांची फार मोठी उणीव आहे व एवढेच नव्हे तर अशा सूचीचे मोल काय असते याची जाणीवही मराठी वाचकात अभावानेच दिसते. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय शास्त्र पदवी परीक्षेचा एक भाग म्हणून आमच्या महाविद्यालयात अनेक सूची विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आम्ही बनवून घेतल्या. या सूचींची व काव्यसंग्रहांची सूचीही 'दिशा'तून दिली. या सर्वच सूची अतिशय दर्जेदार आहेत. त्यात कोणत्याच उणीवा नाहीत असेही नाही याची केंद्र संयोजक म्हणून मला जाण आहे. मात्र ठाणे शहर परिसर व जिल्हा यातील लहान-मोठे साहित्यिक डोळ्यासमोर ठेवून आम्ही विद्यार्थ्यांकडून त्यांच्या साहित्याच्या बनविलेल्या या सूची हे महत्त्वाचे संचित आहे. असे आमचे मत आहे.

सूची साहित्याबद्दल उदासीन असणाऱ्या आपल्या समाजात यातून निष्पत्ती काही झाली नाही. असे संदर्भ साहित्य एकट्या ठाणे केंद्रातच निर्माण होते असे नाही तर महाराष्ट्र भर सुमारे ३० केंद्रातून सरासरी ४० प्रकल्प प्रमाणे प्रतिवर्षी निर्माण होत आहेत. विद्यापीठाच्या आधीच्या कल्पनेनुसार यातील निवडक प्रकल्प विद्यापीठ प्रकाशित करणार होते. त्याचे पुढे काय झाले ते समजले नाही. पण ठाणे केंद्रात तयार करण्यात आलेल्या सुमारे १५० पैकी ५०-६० प्रकल्प तातडीने लक्ष पुरवावे असे आहेत. ठाण्याच्या सार्वजनिक वाचनालयात एकेवर्षी केंद्रातील विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सेवा समूहाने प्रदर्शन भरविले होते, अशी आणखी काही मोठ्या प्रमाणावर प्रदर्शन भरविली गेली. त्यातून प्रकाशनांच्या प्रतिनिधींना बोलावून प्रयत्न केले गेले, तर ठाणे, बिर्ला महाविद्यालय व रुपारेल या तीन केंद्रातील प्रकल्पांना प्रकाश दिसेल. 'या सूचीचे महत्त्व काय व त्या छापून काय करायचे' असा प्रश्न मराठीतील एक नामवंत कवीने आम्हाला विचारला, त्यावेळी संशोधन कार्यात आपण मागेच रहाणे योग्य असे वाटल्यावाचून राहिले नाही.

प्रकल्प मेहनतीने बनविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कष्टांचे चीज हा एक भाग झाला. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात जेव्हा या साहित्यकारांच्या साहित्याचा शोध घेतला जाईल तेव्हा असे संदर्भ प्रकल्प रुपाने उपलब्ध असणे महत्वाचे ठरणार आहे. 'दिशा' च्या वाचकांनी कधी आमच्या महाविद्यालयाला भेट दिली तर हे प्रकल्प त्यांना निश्चित पहायला मिळतील.

सध्यातरी हे उपेक्षित धन कपाटात जागा अडवून पडून आहे !

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष तिसरे / अंक ६ / मे २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | भगवान परशुराम | श्री. शंकर बा. मठ | ३ |
| २) | व्यवसाय - वैज्ञानिक खेळण्यांचा | गीतेश शिंदे | १० |
| ३) | पुस्तक परिचय | | १३ |
| ४) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १४वा) ॥ गुणत्रयविभाग योग: ॥ | आशा भिडे | १६ |
| ५) | उद्याचा विद्यार्थी | सौ. वैदेही अतुल गांगल | २५ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | २८ |
| ७) | नाटक नाम सूची | सौ. छाया मोहिते, पल्लवी तडस | ३० |
| ८) | लेखक नाम सूची | सौ. छाया मोहिते, पल्लवी तडस | ३४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# भगवान परशुराम

*४ मे रोजी परशुराम जयंती आहे. दशावतारांपैकी एक असणाऱ्या या 'चिरंजीव' अवतारासंबंधाने हा अभ्यासपूर्ण लेख आहे !- संपादक*

**जन्म :-**

भगवान परशुरामांचा अवतार लीला-विलास विविधपूर्ण आहे. त्याचे सम्यक् दर्शन घडविणे अवघड आहे. भगवान भार्गवराम हे महाविष्णुचे सहावे अवतार. जे चिरंजीव म्हणूनही प्रसिद्ध आहेत. महर्षी जमदग्नी यांचे देशात अनेक ठिकाणी आश्रम होते. त्यापैकी मलप्रभेच्या परिसरातील आश्रमात वैशाख शुद्ध तृतीयेला सायंकाळी सूर्यास्त समयी या बालकाचा जन्म झाला. कर्नाटकात सौंदत्ती येते हा आश्रम होता. हे गाव मलप्रभा (मलापहारी) नदीच्या परिसरात आहे. भार्गवराम यांचे माता-पिता हे उभयता श्रेष्ठ व्यक्तिमत्वाचे होते. महर्षी जमदग्नी आपल्या विद्या प्रभावाने सर्वत्र ज्ञात होते. रेणुकामाता ही जगन्माताच होती. रेणु राजाने आपल्याला कन्या व्हावी म्हणून कन्याकामेष्टी यज्ञ केला. इक्ष्वाकु वंशातील हा रेणु राजा भागीरथीच्या तीरी नांदत होता. यज्ञकुंडातून रेणुकामातेचा जन्म झाला. कन्या म्हणजे ब्रह्मपदाला घेऊन जाणारी शक्ती होय. 'कं इति ब्रह्म तत्र नयति सा कन्या' अशा महान् उद्धारक शक्तीसाठी रेणु राजाने तप केले आणि यज्ञही केला. कन्या व्हावी म्हणून यज्ञ, ही प्राचीन कालीन दृष्टी निश्चित संस्मरणीय आहे.

**भवितव्यताच श्रेष्ठ :-**

महर्षी जमदग्नी हे ऋत्विक ऋषींचे पुत्र. ऋत्विकांचा आश्रम गौतमी नदीच्या काठी होता. तेथे त्यांनी मोठ्या निष्ठेने तपाचरण केले. रेणुका ही रेणु राजाची म्हणजे क्षत्रिय कन्या. त्याचप्रमाणे ऋत्विकांची पत्नी सत्यवती ही देखील क्षत्रिय कन्या. अशी भगवान भार्गवरामाची पूर्वपीठिका. ऋत्विक हे सिद्ध पुरुष होते त्यांनी दोन चरू बनविले. त्यातील एक चरू आदर्श राजपुत्र प्राप्तीसाठी रेणु राजाच्या पत्नीला म्हणजे जमदग्नीच्या सासूला दिला व दुसरा रेणुकेला जमदग्नीच्या पत्नीला दिला. ऋत्विकांना आदर्श ऋषिकुमाराची अपेक्षा होती यावरून अदलाबदल झाली. जमदग्नींच्या पत्नीसाठी बनवलेला चरू आपल्या चरूपेक्षा प्रभावी असेल या भावनेने सासूने (रेणु, राजाच्या पत्नीने) रेणुकेचे (कन्येचे) चरू भक्षण केले व आपला चरु तिला दिला. त्यामुळे ऋषिकुळासाठीचे तेज राणीच्या पुत्रात उतरले व राजपुत्रासाठीचे तेज रेणुकेच्या पुत्रात भार्गवरामात उतरले.

ऋत्विक ऋषींनी चरू बनविताना आदर्श ऋषिकुमार व आदर्श राजपुत्र कसे असावेत असा विचार करून तसे तेज त्या चरूत अंतर्भूत केले होते. त्याप्रमाणे रेणुकेच्या पुत्रात आदर्श राजकुमाराचे गुण - चक्रवर्ती राजाचे प्रमुख गुण अन्यायाचा प्रतिकार, प्रजेचे संरक्षण, पालनपोषण इत्यादी सत्वगुण युक्त रजोगुण, प्रधान वीरवृत्ती उतरली. मुनिवर्यांच्या उद्देशाप्रमाणे चरूंचे सेवन झाले असते तर परशुराम एक तेजस्वी ऋषिकुमार झाले असते. परशुराम अन्यायाचे प्रतिकार करणारे झाले हे चरूच्या अदलाबदलीमुळेच होय.

**जमदग्नींचा आश्रम :-**

मलप्रभेच्या तीरी जो आश्रम होता तेथे साक्षात वेदधर्म नांदत होता. जमदग्नींच्या समवेत इतर ऋषिमुनींही राहात होते. ती एक विशाल तपोभूमी होती. तेथे अनेक

ठिकाणाहून नवयुवक वेद शिकण्यासाठी येत. सदा सर्वकाळ वेदमंत्राचे घोष तेथे चालत. यज्ञाच्या पवित्र धूमाने तेथील वातावरण पवित्र झालेले असे. रेणुकामाता आदर्श गृहिणी आपल्या पतीच्या प्रत्येक कार्यात साहाय्य करीत. ते एक आदर्श दांपत्य होते. आल्या गेल्याचा सत्कार, दीन दुबळ्यांची सेवा इत्यादी चालत असे. मुनींचा आश्रम असल्याने अपरिग्रह व्रत अवलंबिला जात असे. मात्र आदरातिथ्यात कुठेच कमतरता नव्हती. कारण त्यांच्याकडे कामधेनू होती. ती आश्रमाची अनुपम ठेव होती. कोणीही याचक विन्मुख जात नसे. थोडक्यात जमदग्नींचा आश्रम म्हणजे वेदसेवा, अग्निसेवा, गोसेवा, अतिथिसेवा व सत्कार यांचे आदर्श केंद्र बनला होता.

जमदग्नींच्या आश्रमाची ख्याती सर्वदूर पसरली होती. त्यांचा आश्रम व तेथील कामधेनू यांची माहिती सर्वदूर पसरली. त्यांचा आश्रम पूर्ण स्वावलंबी होता. त्यांचा आश्रम म्हणजे हजारो अभ्यासकांचे केंद्र होते. अभ्यासक तेथे ज्ञानाने तृप्त होत. कामधेनूच्या कृपाप्रसादामुळे आश्रमात सारी व्यवस्था परिपूर्ण होती. आश्रमाच्या आसमंतात वृक्षराजी होती. बहरलेल्या फळबागा, बारमाही फुलत असलेली फुलझाडे, आणि लतावेली ही आश्रमाच्या सौंदर्यात भर घालीत होती. मलप्रभेचे विशुद्ध जल, भोवतालचे निर्झर, पक्ष्यांची किलबिल, गाईच्या गळ्यातील घंटांचे सौम्य आवाज याने सारा आसमंत आनंदाने पुलकित होता आणि या कीर्तीचा सुगंध सर्वत्र पसरला.

### परशुरामाने विद्या संपादिली -

बाल परशुराम अत्यंत तेजस्वी व बुद्धिमान होते. यथाकाल त्यांचे उपनयन झाले. त्या पाठोपाठ त्यांनी वेदाध्ययन केले. वयाची बारा वर्षे होताच तपाचरणासाठी कैलासावर गेले. भगवान परम शिवाकडून त्यांनी धनुर्विद्या मिळविली. ती विद्या शंकराकडून मिळाली म्हणून त्याला ते शंकर विद्या म्हणत. भार्गवरामांनी शिवाला प्रसन्न करून घेतले तसेच श्रीगणेशालाही प्रसन्न करून घेतले. त्याजकडून परशु विद्या संपादन केली. आता भार्गवराम हे परशुराम झाले.

### राम या शब्दातील रहस्य -

राम हे गुण वाचक नाम आहे व तो रहस्यपूर्ण मंत्रही आहे. 'राम' दोन शब्द. 'रा' व 'म'. 'रा' म्हणजे शक्ती. 'म' म्हणजे शिव. शक्ती व शिव यांचे ऐक्य म्हणजे राम. 'रा' शक्तिरिति विख्याता । 'म' शिवः परिकीर्तितः । शिव शक्त्यात्मकं बीजं । राम राम इति गीयते ।

विश्वाची पायाभूत बीजे शिव व शक्ती त्यांचा एकत्रित उच्चार म्हणजे राम. हा राम नामाचा महिमा लक्षात घेऊन ईश्वरावतारांची तीन नावे. राम शब्दाशी निगडित आहेत. भार्गवराम, दाशरथी राम व बलराम. 'रा' शब्दाचा आणखी एक अर्थ अग्नीबीज असा आहे. त्याही अर्थी या अवताराकडे पहावे.

### राजा कार्तवीर्य -

त्याकाळी नर्मदा तीरावर माहिष्मती नगरीत सहस्रार्जुन नावाचा बलाढ्य राजा राज्य करीत होता. तो पराक्रमी होता व दत्तात्रेयाचा भक्त होता. परंतु रजोगुणी होता. त्याच्या महत्वाकांक्षेला सीमा नव्हती. स्वतःच्या बलाचा त्याला अहंकार होता. जमदग्नीच्या आश्रमाची कीर्ती त्याच्या कानावर गेली. कामधेनूची माहितीही त्याला मिळाली. तो ससैन्य सौंदत्तीला आला. त्याचे ऋषीने यथोचित स्वागत केले. जमदग्नीकडून कामधेनू कशी मिळेल हा विचार प्रबल झाला. ती त्याने बळजबरीने पळविली. वास्तविक ऋषिमुनींचे संरक्षण करणे त्याला आवश्यक होते. तेव्हाचे आश्रम म्हणजे विद्या केन्द्रे होती. हे राज कर्तव्य न पाळता उलट आश्रम उद्ध्वस्त केले. तेव्हा परशुराम तेथे नव्हते. त्यांच्या कानावर आश्रमाची हकिकत जाताच त्यांनी सहस्रार्जुनाचा पराभव करून युद्धात त्याचा वध केला.

जमदग्नींनी परशुरामास त्या वधार्थ प्रायश्चित घेण्यासाठी तपाचरण करण्यास सांगितले. परशुराम गेले असता दरम्यान सहस्रार्जुनाच्या मुलांनी पित्याच्या वधाचा बदला घेण्यासाठी जमदग्नींचा आश्रम उद्ध्वस्त केला आणि त्यांच्यावर एकवीस वेळा वार करून त्यांना ठार केले. ही माहिती कळताच परशुराम संतप्त झाले. मातेनेही त्यांना आज्ञा केली. 'कुरु निःक्षत्रियां महीम्' । रेणुका माता स्वतः क्षत्रिय कन्यका जरीही, तिने आज्ञा केली. पृथ्वी निःक्षत्रिय कर. यातील भावार्थ घेतला जावा. प्रजेच्या संरक्षणाऐवजी तिचे शोषण करणारे, जुलूम करणारे यांच्याविरुद्ध मातेच्या आज्ञेने परशुरामाने शस्त्र चालविले.

तसेच मातेच्या सांगण्यावरून कुमारभूमित (जिथे कोणाचे राज्य नाही अशी भूमी) अंत्यसंस्कार करावयाचे ठरविले. त्यासाठी परशुराम सौंदत्तीहून मुक्काम करीत करीत सर्वांसह माहुरगडी गेले. तेथे जमदग्नींच्या देहावर अंत्यसंस्कार केले. त्यावेळी रेणुका मातेने सहगमन केले.

पित्याच्या अंत्यसंस्कारानंतर अन्यायी राजा विरुद्ध मोहीम हाती घेतली. जुलमी व अहंकारी क्षत्रियांना वठणीवर आणण्याचे काम सुरू केले. त्यांनी न्यायी क्षत्रियांचा संभाळ केला. एकवीस वेळा लढाया केल्या. पृथ्वी पादाक्रांत केली. परशुरामांना राज्याची गरज नव्हती. त्यांना स्वतः सम्राट व्हावयाचे नव्हते म्हणून यज्ञ करून सारी संपत्ती, सारे राज्य कश्यपांना दान केले. स्वतःसाठी, स्वतःच्या निवासासाठी नवभूमी निर्माण करण्याचा विचार केला. त्यातून कोकणची निर्मिती झाली.

परमात्म्याचा अवतार त्यांचे जीवनोद्देश हे गीतेत स्पष्ट केल्याप्रमाणे परशुरामांचे जीवनकार्य समजून घेताना करावयास हवा. साधूंचे संरक्षण, समाजघातक पापाचरण करणाऱ्यांचा विनाश आणि धर्म संस्थापना करणे याचसाठी परमात्मा पुनः पुनः अवतार धारण करतो. भार्गवरामाचे कार्यही असेच आहे.

त्यांच्या जीवनातील वैशिष्ट्य म्हणजे एकदा शस्त्र खाली ठेवल्यावर त्यांनी पुनः शस्त्राला हात म्हणून लावला नाही. ते चिरंजीव होते. रामावतारात त्यांनी रामाला विष्णुचापही देऊन टाकला. महाभारत काळात केवळ शिष्यांना मार्गदर्शन केले. धनुर्विद्या शिकविली. केवळ आचार्य या नावाने त्यांनी प्रामुख्याने धर्मकार्य केले. त्यांनी श्रीकृष्ण बलरामाना उपदेश केला. युधिष्ठिरास दर्शन दिले. त्यांच्याकडून विद्या प्राप्त झालेले तीन प्रख्यात वीर महाभारत युद्धात आघाडीवर असलेले आढळतात. ते म्हणजे भीष्म, आचार्य द्रोण व दानशूर कर्ण. संपूर्ण महाभारत युद्धावर या परशुराम शिष्यांची घनदाट छाया पडलेली आहे. संपूर्ण युद्धात भार्गव युद्ध विद्येचा आविष्कार दिसतो. परशुरामाचे शिष्य अजिंक्य होते. पितामह भीष्म, आचार्य द्रोण व दानशूर कर्ण यांनी शस्त्र खाली ठेवल्यावरच त्यांचा वध झालेला आहे. शस्त्र हाती असे तोवर ते अजिंक्य होते. हे रहस्य माहीत असल्यामुळेच श्रीकृष्णानी युक्ति प्रयुक्तीने शस्त्र खाली ठेवतील हे पाहण्यास पांडवाना सुचविले होते. त्याचे कारण भीष्म, द्रोण यांनी अन्यायी पक्ष निवडला होता व कर्ण हा मुळातच चुकीच्या भूमिकेचा आश्रय करणारा होता.

भगवान परशुरामांच्या चरित्राकडे अनेकांचे दुर्लक्ष झाले आहे. पुराणिक इत्यादिकडून अनेक वेळा टवाळ विधाने केली जातात. परंतु त्यातील तथ्ये शोधून पाहिली जात नाहीत. उदाहरणार्थ - १) परशुरामांनी एकवीस वेळा क्षत्रिय संहार केला. २) त्यांनी मातृवध केला. ३) दाशरथी रामाने त्यांचा पराभव केला. इथे एक गोष्ट लक्षात घेणे या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. परशुरामांनी केवळ अन्यायी व जुलमी राजांविरुद्ध शस्त्र उचलले. त्यासाठी त्यांनी एकवीस मोहीमा हाती घेतल्या. प्रजेच्या विरोधातील राजाशी ते लढले. न्यायी व धर्मशील राजांना त्यांनी केव्हाही त्रास दिला नाही. जनक राजाशी त्यांची मैत्री होती. त्यांच्याकडे त्यांनी शिव धनुष्य ठेवले होते.

दाशरथी रामाची त्यांना कल्पना होती. उभयतांच्या भेटीत काय घडले. भार्गवरामाकडील वैष्णवी तेज दाशरथी रामाकडे संक्रमित झाले ते युद्ध नव्हते. एका अवताराचे दुसऱ्यावर जय मिळविण्याचा वा एकमेकावर मात करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. उभयता सामर्थ्य संपन्न व सर्वज्ञ पूर्ण पुरुष होते. नृसिंह पुराणात आवेश अवतार याची कल्पना देताना असा उल्लेख केला आहे की -

'ततः परशुरामस्य देहात् निष्क्रम्य वैष्णवम् । पश्यतां सर्वभुतानां तेजो रामामुखे अविशत् ।' त्यानंतर भगवान परशुरामांच्या शरीरातून वैष्णवी तेज बाहेर पडले आणि त्या तेजाने सर्व उपस्थितांच्या देखत दाशरथी रामाच्या मुखमंडलात प्रवेश केला. तेज दाशरथी रामाकडे गेल्यावर प्रसन्नपणे भार्गवराम म्हणाले, 'रामा तु प्रत्यक्ष विष्णुचा अवतार आहेस, याची मला खात्री पटली, असे तेज संक्रमित होणे, यालाच आवेश अवतार म्हणतात. वैष्णवी धनुष्याला त्यांनी श्रीरामांना बाण लावावयास सांगितले याचा अर्थ सर्वासमक्ष श्रीराम हे विष्णुचे अवतार आहेत याची खात्री पटवून दिली.

परशुरामांनी मातृवध केला म्हणजे काय? गीतेत कर्माचा विचार करताना कर्म, अकर्म, विकर्म याबद्दल म्हटले जाते. कर्म म्हणजे योग्य कृती वा कर्तव्य, अकर्म म्हणजे अयोग्यकृती आणि विकर्म म्हणजे विशेष व्यक्तिगत कृती (शास्त्र विरुद्ध असलेली) उदाहरणाने स्पष्ट होईल. बिभीषणाने ज्येष्ठ भ्रात्याचा त्याग केला. धर्म सांगतो की, ज्येष्ठ भ्राता पित्यासमान, 'ज्येष्ठो भ्राता पितु: समा ।' मग त्याची अवज्ञा बिभीषणाने केली. ते त्याचे व्यक्तिगत विशेष कर्म. प्रल्हादाने प्रत्यक्ष पित्याची आज्ञा मोडली. तेही त्याचे विकर्मच होय. ही सर्व साधारण रीत नव्हे. भार्गवराम मातृभक्त व पितृभक्तही होते. पित्याचे सामर्थ्य परशुराम जाणून होते. पित्यांनी आज्ञा करताच मातेचा शिरच्छेद केला. जमदग्नी प्रसन्न झाले व वर दिला. तत्काळ त्या वराने माता पुन: जिवित व्हावी हे मागितले. मातेला जमदग्नी पुन: सजीव करू शकतात ही खात्री त्यांना होती. माता जिवंत झाली. मातृवधाची ही घटना संदर्भासहित लक्षात घेतल्यास, मातृ-पितृ परायणता - पित्याच्या आज्ञेचे पालन, माता पुन: जीवित झाली तो भाग, जमदग्नीचे तप: सामर्थ्य आणि परशुरामाना असलेले पूर्ण ज्ञान यांचा संबंध या घटनेशी जोडणे आवश्यक आहे.

मातेच्या आशीर्वादाने परशुराम चिरंजीव झाले होते. भूतलावरील त्याचे कार्य चालूच होते. परशुराम आणि श्रीकृष्ण व बलरामांची भेट संगम माहुली (जि. सातारा) येथे कृष्णावेण्णाच्या संगमापाशी झाली. तेथे परशुरामांनी त्यांना दुर्गनीति शिकविली व मन्त्रोपदेश केला (हरिवंश पुराण). आपल्या प्रखर तपस्येने भगवान शिवाला प्रसन्न करून घेतले आणि त्याच्यापासून भार्गवरामाने युद्धनीति प्राप्त करून घेतली. शिवाने युद्धनीति, धनुर्विद्या दिली शिवाय ही विद्यापरंपरेने शिष्याना देऊन त्याचा प्रसार करण्याची अनुमती देखील परशुरामाला दिली. मात्र या विद्येचा उपयोग अन्यायाचे परिमार्जन आणि दुष्ट प्रवृत्तीचा नाश या साठीच झाला पाहिजे हा दंडक घातला. परशुरामाने ही विद्या भीष्म, द्रोण व कर्ण यांना दिली. मात्र या तिघांनी अन्यायाची बाजू घेतल्याने त्यांचा नाश झाला.

**अजिंक्य शिष्य व त्यांचा नाश -**

परशुरामाच्या शिष्यात भीष्मांचा विचार महत्वाचा आहे. भीष्म युद्ध विशारद व निग्रही होते. ते कठोर प्रतिज्ञा करणारे होते. त्यांना धर्माचे सूक्ष्म ज्ञान होते. भीष्म युधिष्ठिर संवाद म्हणजेच शांतिपर्व. धर्म चिकित्सेने नटलेला हा पर्व आहे. ते शरपंजरी असताना त्यांच्याकडून राजधर्म समजावून घेण्यासाठी युधिष्ठिराला श्रीकृष्णाने पाठविले. ज्ञान, चिकित्साबुद्धी, पटवून देण्याची हातोटी भीष्माकडे विशेषत्वाने होती. परशुरामाचा हा शिष्य युद्धा अजिंक्य आणि ज्ञानात परमोच्चपदी विराजमान होता. ते कौरवांच्या

बाजूने लढले म्हणून श्रीकृष्णाने युक्तीचा वापर करून त्यांना शस्त्र खाली ठेवावयास लाविले. मगच ते शरपंजरी पडले.

परशुरामाचे दुसरे शिष्य द्रोणाचार्य. ते धनुर्वेदाचे आचार्य होते. त्यांची धनुर्विद्या आपल्या गुरूच्या तोडीची होती. केवळ द्रोणामुळे अर्जुन धर्नुधर झाला. पुत्र निधनाची वार्ता ऐकून त्यांनी शस्त्र खाली ठेविले तेव्हाच त्यांचा वध झाला. ते हातात शस्त्र असेतो अजिंक्य होते.

परशुरामाचे तिसरे शिष्य दानशूर कर्ण. हा महान बलशाली होता. हा परशुरामाची अप्रतिम सेवा करणारा, त्यांच्याकडून कष्टाने ब्रह्मास्त्र प्राप्त करून घेणारा होता. श्रीकृष्णाला याची जाणीव होती म्हणूनच त्याच्या रथाचे चाक भूमीत अडकले असता त्यावर बाण टाकण्यास अर्जुनास प्रवृत्त केले. असत्य कथनामुळे परशुरामाने त्याला इतकेच सांगितले की, मरण प्रसंगी तुला विद्येची आठवण राहणार नाही. हे कर्णा, तुझ्यासारखा योद्धा भूतलावर असणार नाही. त्याचा दोष इतकाच तो गुरूशी असत्य बोलला व त्याजपासून विद्यासंपादन केली. तसेच द्रौपदी कौरवाकडून पणात जिंकली गेली. तेव्हा तो आनंदाने फुलून गेला हे श्रीकृष्णाला माहीत होते. हेच त्याच्या मृत्यूचे कारण ठरले.

**दंभोद्भव कथा -**

श्रीकृष्ण कौरव सभेत शिष्टाईला गेले होते. त्यावेळी परशुरामही उपस्थित होते. त्यांनी अहंकारी धृतराष्ट्राला दंभोद्भवाची कथा सांगितली. हा एक अहंकारी राजा होता. त्याला वाटे माझ्याहून कोणी श्रेष्ठ व सबळ असू नये. म्हणून नित्य तो सर्वांना आव्हान करी. एकदा एक तपस्वी त्याला भेटला तो त्याला म्हणाला, गंधमादन पर्वतावर नर व नारायण दोन ऋषी तपस्या करत आहेत. त्यांच्या पासंगालाही तुझे बल पुरणार नाही हे ऐकून क्रोधाने तो गंधमादन पर्वतावर त्यांच्या आश्रमात गेला व त्यांना युद्धाचे आव्हान केले. त्यावेळी नर त्याला म्हणाला, आम्ही क्रोध इत्यादी मन: संयमाने जिंकले आहे अशा प्रकारचा विचार आम्ही करू शकत नाही. तरी तो आग्रह करू लागलातच नराने मूठभर बोरूच्या काटक्या घेतल्या व दंभापुढे टाकल्या. या काटक्या बरोबर युद्ध कर. दंभोद्भव उपहासाने त्याकडे पाहू लागला. मग युद्धात सारी शक्ती लावली तरी त्याला पराभव पत्करावा लागला. इतके सांगून भार्गवराम धृतराष्ट्राला म्हणाला, हा फक्त नराचा प्रभाव होता, नारायणाचा प्रभाव त्याला कळला नाही. म्हणून राजा विचार कर. ती नर-नारायणाची जोडी म्हणजे हल्लीचे पार्थ व श्रीकृष्ण होत. (उद्योग पर्व अध्या. ९४ ३१ ते ३४ श्लोक)

भार्गवरामाने कोंकण ही नवभूमी निर्माण करून तेथेच आपला निवास ठेविला. सागराकडून मिळविलेली ही भूमी त्यांना मुख्यत्वे स्वत:च्या नित्य वस्तीसाठी हवी होती. इथे नवीन वसाहतीची स्थापना केली. भडोच पासून तो थेट कन्याकुमारीपर्यंतचा प्रदेश कोंकण म्हणून प्रसिद्ध आहे. भूभागापैकी चिपळूण जवळील पेठे परशुराम हा रम्य परिसर त्यांनी निवास स्थान म्हणून निवडला. यालाच महेंद्रगिरी असेही म्हणतात. सारे कोकणही परशुराम भूमीच. भडोच जवळील नर्मदा परिसर, तो थेट दक्षिण टोकाला केरळचा परिसर. सर्वत्र परशुरामाचे नाव दुमदुमत आहे. कोकणाला अपरान्त असेही म्हणतात. (अपर+अन्त - पश्चिमेचे टोक) सह्याद्री व सागर यांच्या दरम्यानची भूमी म्हणजे अपरान्त. देव भार्गवराम या कोंकण भूमीचे अनभिषिक्त सम्राट होत.

**परशुराम मंदिराचा जीर्णोद्धार -**

ब्रह्मेन्द्र स्वामी श्री गणेशाच्या आदेशानुसार पेठे परशुराम येथे येऊन राहिले. त्यांनी या स्थानाचा जीर्णोद्धारही केला. त्यांना भक्तजन परशुरामाचा अवतार मानीत. विविध तीर्थ स्थळांना भेटी देत ते परशुराम क्षेत्री आले. ब्रह्मेन्द्र स्वामी चार महिने समाधीत असत. उर्वरित आठ महिन्यात ते राजकारणही करीत. ब्राह्मतेज व क्षात्र तेज त्यांच्यात

एकवटलेले होते. परशुराम क्षेत्राहून जे धावडशीला गेले. ते पहिले बाजीराव, चिमाजी अप्पा यांना गुरुस्थानी होते. येथे परशुराम येथेही जीर्णोद्धाराचे काम केले. भार्गवरामचे मुख्य मंदिर, उजव्या बाजूस सिद्धिविनायकाचे मंदिर; त्यामागील माता रेणुकेचे मंदिर, संकटमोचन हनुमान मंदिर व छोटा तलाव ही सारी कामे स्वामींनी पार पाडली.

स्वामी इथे येण्यापूर्वी स्वामी रामदास व छत्रपति शिवराय येऊन गेले आहेत. रामदासांनी परशुरामाची प्रार्थना केली आहे ते म्हणतात आपण चिरंजीवी आहात. आपले व माझे गोत्र एकच आहे. मजवर कृपा करा. मी सदैव आपलेच चिंतन करतो. 'तुला चिंतितो मी दास राघवाचा' भार्गवराम म्हणजे मूर्तिमंत क्षात्र तेज स्वराज्य बांधणीसाठी त्यांची आठवण व्हावी हे साहजिकच आहे.

क्षत्रियांचा अनेक वेळा नि:पात करूनही ते क्षत्रियांचे दैवत झाले. परशुरामानी राज्ये जिंकली व दानही करून टाकली. स्वत:कडे राजेपण न घेता शासनाची घडी मात्र त्यांनी बसवून दिली. प्रसंग येताच राजाचे कर्तव्य म्हणून जे कार्य हाती घ्यावे लागते ते जनहितार्थ कर्तव्य म्हणूनच बजाविले आहे. अनेक ग्रंथातून याचा उल्लेख आढळतो. परशुराम कल्पसूत्र, त्रिपुरारहस्य, पुष्कर परशुराम संवाद, अग्निपुराण इत्यादी.

परशुराम वरुणाकडे राज्य व्यवस्था शिकण्यासाठी गेले असता त्यांना पुष्कराकडे आपल्या पुत्राकडे पाठविले - त्यांचा संवाद पुष्कर- परशुराम संवाद म्हणून प्रसिद्ध आहे. पुष्कर परशुरामाला सांगतात पूर्वकाळी स्थिर राज्यासाठी इंद्रांनी स्तुती केली तशा जनकल्याणार्थ सर्वांनी करावी. सर्व प्रकारच्या विद्या स्वातंत्र्यासाठी उपयुक्त आहेत. स्तुती केल्यावर ब्रह्माने इंद्राला त्यांचे मनोगत ओळखून राज्य स्थिर करणे, युद्धात विजयी होणे यासंबंधी मार्गदर्शन केले. (अग्निपुराण).

राज्यलक्ष्मी: स्थिरत्वाय यथें द्रेण पुरा श्रिय: ।

स्तुति: कृता तथा राजा जनार्थं स्तुति माचरेत् ।

अनु. २३७.१

दण्ड शासनाचा योग्य उपयोग करून सर्व प्राणिमात्रांचे रक्षण केले जावे. यासाठी ब्रह्मदेवाने राजाला उत्पन्न केले. राजाचा प्रभाव कोणी पाहू शकत नाही. कारण तो भास्करासारखा असतो. मात्र त्याच्या दर्शनाने प्रजेला प्रसन्नता लाभते तेव्हा तो आल्हादकारक चंद्र असतो. गुप्तहेराकडून तो सर्व प्रदेश व्यापतो तेव्हा तो वायुदेवाप्रमाणे असतो. सर्वस्वाचे दान करताना तो कुबेर असतो. सर्वांना न्यायाने वागवतो. भेदभाव करत नाही. भूत रक्षण करणारा, जनरक्षण करणारा हा देवेन्द्र आहे. उत्साह, मंत्र, प्रभु व दैवी या चारही शक्तींनी तो पालन करतो. या चारही वैष्णवी शक्ती आहेत. प्रकर्षाने गुण असलेला राजाच लोकप्रिय होतो. राजा कर्तव्यतत्पर व ध्येयवादी असला पाहिजे. परशुरामाचा राजधर्म या प्रकारचा आदर्शतम आहे.

(विष्णुधर्मोत्तर २-७१ श्लोक १ ते १२)
दण्ड प्रवर्तनार्थाय राजा सृष्ट: स्वयंभुवा ।
तेजसा परमं कश्चित् नैवराबनेति वीक्षितुम् ।
तदा भक्ति लोकेषु राजा भास्करवत् प्रभु: ।
उत्साह मन्त्रशक्ति: या प्रभुशक्तिश्च दैविकी ।
चतस्त्र शक्तय: तत्र वैष्णव्य: परिकीर्तिता: ।
को समर्थ: प्रजापातुं विना वैष्णव तेजसा ।

जामदग्न्य धनुर्वेद

श्री कृष्णाजी विनायक वझे यांच्या 'प्राचीन युद्धविद्या' या ग्रंथातून उद्धृत काही भाग. मूळ ग्रंथ उपलब्ध नाही.

शस्त्रप्रकार - अमुक्तं, मुक्तामुक्तं, मुक्तं, यन्त्रमुक्तं इति चतुर्धा शस्त्रम् ।

अमुक्तं - खड्गादि, मुक्तामुक्तं - कुंतादि (भाला

इत्यादि) मुक्तं चक्रादि, यन्त्रमुक्तं-शरादि (बाण) मन्यमुक्तं अस्त्रं उच्यते । तत् च ब्राह्मं वैष्णवं, प्राजापत्यं, ऐन्द्रं, वायव्यं, आग्नेयं इति सप्तविधं गुरुदत्तानि चोदितम् ।

अनुवाद - तलवारीने लढणे हे अमुक्त शस्त्र. भाला फेक - हे उभयविध म्हणून कधी टाकणे कधी हातातच ठेवणे. चक्र हे टाकावयाचे असते आणि काही साधनाने जोराने फेकणे - धनुष्याच्या मदतीने बाण सोडणे हे यंत्रमुक्त. शस्त्र ज्यावेळी मंत्रयुक्त करुन सोडले जाते तेव्हा ते अस्त्र होते. मंत्रयुक्त झाल्याने त्याची क्षमता अनेक पटीने वाढते. अस्त्र व शस्त्र यातील फरक -

अस्यते क्षिप्यते यत् च यन्त्रमन्त्रादिभि: सदा ।
अस्त्रंतम् अन्यथा शस्त्रं असि कुन्तादिकं यथा ।

जे यन्त्र व मन्त्राच्या साहाय्याने शत्रूवर टाकले जाते त्याला अस्त्र म्हणावे. एरवी तलवार, भाले यांना शस्त्र म्हणावे.

चार प्रकारचे लक्ष्य - लक्ष्यं चतुर्विधं प्रोक्तं स्थिरंचैव चलं तथा

चलाचलं द्वयचलं वेधनीयं क्रमेण तत् ।

बाणाने ज्याचा भेद करावयाचे ते लक्ष्य. ते स्थिर आहे का हलते आहे वा दोन्ही आहे अगर उलटसुलट फिरणारे आहे का वेगाने धावणारे आहे याचा विचार करून तसा वेध घ्यावा त्यासाठी बाण किती तीक्ष्ण असावा. असे सांगितले आहे की हत्तीचे शरीर वेधून त्याला भेदून जाणारा बाण असावा. धनुष्याची दोरी मर्यादेपर्यंत ओढावी, ती ढिली केव्हा करावी, यावर बाणाची गति असल्याचे म्हटले आहे.

मन्त्रयुद्ध -

मननात् त्रायते यस्मात् तस्मात् मन्त्र इति स्मृत: ।
मन्त्ररूपा भवेत् शक्ति: मननत्राण धर्मिणी ।
प्रयोग चोपसंहारे यो वेत्ति स धनुर्धर: ।

ज्याच्या चिन्तनाने रक्षण होते त्याला मंत्र म्हणतात. जसा मंत्र तशी शक्ती त्यामुळेच मन्त्राने रक्षण करता येते. याचा प्रयोग व थोपवणे जो जाणतो तो धनुर्धर होय.

श्री रामधारी सिंह दिनकर यानी श्री परशुराम की परीक्षा हे हिंदी काव्य १९६२-६३ साली लिहिले आहे. १९६२ सालीच चीनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी परशुरामाना त्यांनी आव्हान केले आहे. काही पंक्ती उद्धृत केल्या आहेत.

भारत अपने घर मे ही हार गया है । नेता निमग्न दिनरात शान्तिचिन्तन मे ।

यज्ञाग्नि हिंदमे समिध नही पाती है । पौरुषकी ज्वाला रोज बुझी जाती है ।

आवेगा अपना महावीर आयेगा । अंशावतार संमिलित विष्णुशंकर का ।

जो सन्त धर्म के लिये खड्ग धरता है । आवो कवियो जपगान कल्पना तानो ।

अंगार हार अरपो अर्चना करो रे । आ रहा मित्र भारतभर के जनजनका ।

भवितव्य भूत गौरव से छिन्न नही होगा । तुम सोओगे तबभी वह ऋषि जागेगा ।

एक हात मे परशु एक मे कुश है । आरहा नये भारत का भाग्य पुरुष है ।

भार्गव रामाचे मुख्य कार्य धर्म संस्थापना अर्थात वेद धर्माची संस्थापना. वेद म्हणजे ज्ञान. समाजाच्या शाश्वत ज्ञानाचा परिचय करून देणे, सर्वांचे कल्याण हीच वेदाची भूमिका. ही वाणी सर्व जणांना ऐकवावी, ही वाणी कल्याणकारी आहे. ती साक्षरांना, निरक्षरांना ऐकवा. स्वकीयांना तसेच परकीयानाही ऐकवा. सर्वांना ही वाणी ऐकवा हे ईश्वरी कार्य आहे.

(पान नं. १२ वर)

# व्यवसाय - वैज्ञानिक खेळण्यांचा

*बांदोडकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. उमेश लखित यांच्या वेगळ्या व्यवसायाबद्दल घेतलेली ही मुलाखत. श्री. लखित माजी विद्यार्थी संघाचे कार्यकारिणीचे पदाधिकारीही आहेत. - संपादक*

एकविसाव्या शतकात शिक्षणाला आपण अवास्तव महत्त्व दिले आहे. टक्क्यांच्या या वाढत्या मारामारीमुळे लहान मुलांना नकळत आपण शिक्षणाच्या महाजाळ्यात टाकतो. त्यामुळे शाळा, कोचिंग क्लास सांभाळून खेळायचं म्हटलं तर गृहपाठ कधी करायचा हा यक्ष प्रश्न मुलांसमोर उभा ठाकतो. पण अभ्यास आणि खेळ या दोन्ही गोष्टी एका ठिकाणी जुळून आल्या तर? काय, विश्वास बसत नाही ना ! पण हे खरं करून दाखवलंय 'श्री. उमेश लखित' या व्यावसायिकाने. उमेश लखित यांचा एक आगळा-वेगळा 'वैज्ञानिक खेळण्यांचा' व्यवसाय आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या विज्ञानाच्या तसेच गणिताच्या सिद्धांतावर आधारित दीडशेहून अधिक खेळणी त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. लहान मुलांना काहींना काहीतरी नव-नवीन करण्याची उत्सुकता असते. मुलांच्या या धडपडीला दिशा देणारी वैज्ञानिक खेळणी ही एक नवी संकल्पना खेळासोबत मुलांच्या आकलनशक्तीत नक्कीच भर पाडते. उदाहरण द्यायचं झालं तर सापशिडीसारखा दिसणारा परंतु साप व शिडीशिवाय असलेला पट व सोंगट्या या खेळाद्वारे मुलांचे अंकगणित सुधारण्यात नक्कीच मदत होते. या वैज्ञानिक खेळण्यांबद्दलची तुमचीही उत्सुकता आता वाढली असेलच ना ! मग या खेळण्यांबद्दल उमेश लखित यांच्या कडूनच अधिक जाणून घेऊया.



श्री. उमेश लखित

**तुमच्या व्यवसायाचे नेमके स्वरूप सांगाल का?**

"माझा व्यवसाय हा वैज्ञानिक खेळण्यांचा असून मी 'थर्ड वेव्ह सायंटीफीक टॉईज लिमिटेड' या कंपनीसाठी डिस्ट्रिब्यूटर म्हणून काम पाहतो. म्हणजेच निर्माता आणि ग्राहक यांमधील एक दुवा असे माझ्या कामाचे स्वरूप आहे. आमची खेळणी ३ री ते १२ वी या वयोगटात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असून १५० च्या वरती विविध प्रकारची खेळणी आमच्याकडे उपलब्ध आहेत. त्यात लोहचुंबकापासून टेलिस्कोपपर्यंत इतकी मोठी रेंज उपलब्ध आहे आणि ही खेळणी मुलांच्या देखील पसंतीस पडतात. म्हणजेच मुलांच्या हातात मोटारी, मेकॅनो आणि बाहुल्यासोबत लोहचुंबक, भिंग, प्रिझम किंवा साधे मायक्रोस्कोप, टेलिस्कोप अशी वैज्ञानिक खेळणी जर दिली तर ती नक्कीच खूप खूश होतात, असा माझा अनुभव आहे. या वैज्ञानिक खेळण्यांमुळे मुलांची विचार शक्ती काम करायला लागते. त्यांच्या बुद्धीला चालना मिळते. शाळेत जेव्हा शिक्षक एखादा प्रयोग पन्नास विद्यार्थ्यांसोबत दाखवतात. तेव्हा आपल्याला त्या प्रयोगाचे साहित्य नीट हाताळता येत नाही. त्यामुळे मुले समाधानी नसतात. मग तेच प्रयोग जर घरच्या घरी अगदी सोपेपणाने मुलांना या वैज्ञानिक खेळण्यांद्वारे करता आले तर त्यांच्या आकलनशक्तीत, विचार करण्याच्या प्रक्रियेत वृद्धी होते. त्याच बरोबर शिकता शिकता त्यांचे मनोरंजनदेखील होते. म्हणजेच शालेय शिक्षण घेता घेता 'प्रॅक्टिकल नॉलेज' म्हणजेच प्रायोगिक ज्ञान देण्याचे काम ही वैज्ञानिक खेळणी करतात आणि अशी उपयुक्त खेळणी मुलांपर्यंत पोहोचवणे असे माझ्या कामाचे थोडक्यात स्वरूप आहे."

**अशा प्रकारची प्रदर्शने भरवून वैज्ञानिक खेळण्यांना उपलब्ध मार्केट किती मोठे आहे? लोकांचा प्रतिसाद कसा असतो?**

"पहिली गोष्ट सांगायची झाली तर प्रदर्शन मेळ्यात आम्ही कधीच आमच्या वैज्ञानिक खेळण्यांचा स्टॉल उभारत नाही. कारण सोबत असणारे ८०-९० स्टॉल यामध्ये विविध प्रकारची उत्पादने म्हणजेच साड्या, चिनी मातीची भांडी, शोभेच्या वस्तू, दागिने विक्रीसाठी ठेवलेली असतात आणि लोकांचा या गोष्टी विकत घेण्याकडे जास्त कल दिसतो. त्यामुळे वैज्ञानिक खेळण्याचा स्टॉल यामध्ये लपून राहतो. म्हणून आमचे जे ग्राहक आहेत म्हणजेच लहान मुले यांच्याशी आम्ही थेट संपर्क साधतो. त्यासाठीच आम्ही आमचे प्रदर्शन शाळाशाळांतून भरवतो. याचा फायदा असा होतो की आम्हाला थेट मुलांपर्यंत पोहोचता येते. खास करून शिक्षकांना या वैज्ञानिक खेळण्याची प्रयोगक्षमता पटल्यामुळे ते मुलांना अधिक सोप्या रीतीने या खेळण्यांबद्दल समजावून देतात आणि मुले आकर्षित झाल्यामुळे आपोआपच आमचे ग्राहक तयार होतात. म्हणजेच अशी शाळेतील प्रदर्शने या खेळण्यांसाठी उपयुक्त ठरतात व त्याला चांगले मार्केट उपलब्ध होते. ही खेळणी तशी लोकांसाठी नवीन असल्यामुळे लोकांचा प्रतिसाद हा संमिश्र स्वरूपाचा असतो. परंतु आज असेही काही पालक आहेत जे या महिन्यात आपल्या पाल्यासाठी एखादं खेळणं खरेदी केल्यावर पुढच्या महिन्यात दुसरं खेळणं विकत घेतात. म्हणजेच आमचे काही कायम स्वरूपी ग्राहक देखील निर्माण झाले आहेत."




**चीनची खेळणी व आपली 'वैज्ञानिक खेळणी' यातील काही मुलभूत फरक आपणास जाणवतो का?**

चीनची खेळणी व वैज्ञानिक खेळणी यात खूप मोठा फरक आहे. चीनची खेळणी ही इलेक्ट्रॉनिक्सच्या तत्वांवर चालतात आणि त्यात मुलांना प्रयोग करण्यासारखे काहीच नसते. म्हणजेच उदाहरणार्थ आपण रिमोट कंट्रोलची गाडी जर घेतली तर हे बटन दाबल्यावर गाडी पुढे जाते व ते बटन दाबल्यावर मागे येते एवढाच या खेळण्यातला भाग असतो. त्यामुळे मुलांच्या मनोरंजनाचा तो एक भाग होऊ शकतो. परंतु वैज्ञानिक खेळणी मनोरंजनाबरोबरच विज्ञान गणिताची देखील मुलांना गोडी लावतात. हा मुलभूत फरक चीनची खेळणी व वैज्ञानिक खेळण्यांबद्दल सांगता येईल.

**वैज्ञानिक खेळणी ज्या वैज्ञानिक तत्वांवर चालतात त्या तत्वांबद्दल असणारा आपल्याकडील अवेअरनेस किती आहे?**

"वैज्ञानिक तत्वांचा अवेअरनेस नाही असं म्हणता येणार नाही कारण जे दररोजच्या जीवनात घडतं तेच खरं विज्ञान होय. तसेच ही खेळणी मुलांच्या शालेय अभ्यासक्रमाशीच निगडीत असल्यामुळे या खेळण्यांबद्दल जाणून घेणे कठीण जात नाही. आता 'हॉवर क्राफ्ट' असं म्हटलं तर चटकन लक्षात येत नाही. पण घर्षण रहित चक्ती असं म्हटल्यावर पालकांना त्या खेळण्याबद्दलची साधारण माहिती असते असं लक्षात येतं. तसेच प्रत्येक वैज्ञानिक खेळण्यांवर असलेल्या साध्या सरळ सूचनांमुळे ते समजून घ्यायला सोयिस्कर पडतं आणि एकूणच वैज्ञानिक तत्वांबद्दलचा लोकांमधला अवेअरनेस जाणवतो."

**वैज्ञानिक खेळण्यांचे मार्केटिंग करताना आपल्याला प्रामुख्याने येणारे अनुभव कोणते?**

''आधीच सांगितल्याप्रमाणे आम्ही शाळांतून आमच्या खेळण्यांचे प्रदर्शन भरवत असतो. त्यामुळे आम्हाला आमचे थेट ग्राहक भेटतात. या मुलांना, त्यांच्या पालकांना योग्य तऱ्हेने एखाद्या खेळण्याची माहिती दिल्यास ते खेळणं नक्कीच त्यांच्या पसंतीस उतरते. परंतु अशी खेळणी नवीन असल्यामुळे त्यांच्या गुणवत्तेबद्दल, दर्जाबद्दल पालकांच्या मनात अनेक शंका असतात. जर त्या शंका सोडवल्यास व खेळण्यांचे फायदे लक्षात आणून दिले तर पालक ती खेळणी विकत घेतात. तसेच मजेशीर गोष्ट सांगायची झाली तर पहिले ती गोष्ट कोणी विकत घेतंय की नाही याकडे सर्वांचं लक्ष असतं आणि एखाद्याने जर ती विकत घेतली तर त्या खेळण्यांकडे आपोआपच गर्दी जमते. असे अनेक अनुभव या खेळण्यांचे मार्केटिंग करताना येतात.''

**आपण या व्यवसायाकडे कसे वळलात?**

''माझे शिक्षण विज्ञान शाखेतूनच झाले असल्यामुळे मला मूलतः विज्ञानाची खूप आवड आहे. त्यामुळे विज्ञानाचा प्रसार व्हावा, असे सहाजिकच मला वाटते. तसेच मुलांशी निगडित काही तरी करण्याची माझी मोठी इच्छा असल्यामुळे या वैज्ञानिक खेळण्यांद्वारे सतत मी त्यांच्या संपर्कात असतो आणि एखादं खेळणं विकत घेतल्यावर मुलांच्या चेहऱ्यावर जो आनंद असतो तो मला खूप मोलाचा वाटतो. आपण करत असलेल्या कामाबद्दल समाधान वाटते. तसेच या व्यवसायाचे असलेले नाविन्य हे देखील या व्यवसायाकडे वळण्याचे एक कारण आहे.''

**या व्यवसायाला असणारे भवितव्य काय?**

'वैज्ञानिक खेळण्यांचा' व्यवसाय हा काही फार मोठा व्यवसाय नाही. कारण गेल्या तीन-चार वर्षांपूर्वीच हा व्यवसाय सुरू झाला आहे. त्यामुळे लोकांना कळायला थोडा वेळ लागेलच. परंतु हळूहळू लोकांना या खेळण्यांबद्दल कळायला लागले तर नक्कीच हा व्यवसाय मोठे रूप धारण करू शकेल अशी आशा आहे.


**-गीतेश गजानन शिंदे**

ठाणे.

दूरध्वनी : २५३७ ९५१९



श्री. उमेश ललित यांच्या संपर्काचा तपशील
लक्ष्मी छाया, शास्त्रीनगर, कळवा, ठाणे - ४०० ६०५.
दूरध्वनी : २५३८ १५७६
भ्रमण ध्वनी : ९८२१९७७०५६८


---

(पान नं. १० वरून चालू)

## भगवान परशुराम

परशुरामांनी राजनीति अवगत केली, ती समाजाला वळण लावण्यासाठी, धनुर्वेद प्राप्त करून घेतला तो अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी. पृथ्वीचे ऐश्वर्य मिळविले ते दान करून टाकण्यासाठी, अपरान्त वसाहतीची घडण केली, ती वैदिक संस्कृतीची प्रतिष्ठापना करण्यासाठी अवधूत दत्तात्रेयापासून श्री विद्येचे सुलभीकरण करून घेतले ते मानवाच्या अंतिम कल्याणासाठी .

थोडक्यात परशुरामाचे व्यक्तिमत्व मुखात वेद, पाठीवर खड्ग, हातात धारदार कुऱ्हाड इतक्या सावधपणाने हा भार्गवराम अन्यायाच्या परिमार्जनासाठी सतत कार्यरत आहे. भृगुकुलोत्पन्न परशुरामाचा जयजयकार असो. त्यांना कोटिकोटी भारतवासियांकडून वंदना !


**शं. बा. मठ**

६, कुमार आशिष,

राम मारुति रोड,

ठाणे - ४०० ६०२.

# पुस्तक परिचय

## श्रीनारद भक्तिपत्रे (विवरण)

रामायण, महाभारत आणि पुराण ग्रंथांमध्ये महर्षि नारद हे अद्वितीय पात्र आढळते. पीतांबर परिधान करून गळ्यांतील वीणेमधून सुस्वर वाजवत प्रसन्न मुद्रेने आणि भक्तीने नारायणाच्या नामात धुंद होऊन ते तीन्ही लोकांत संचार करतात. ते त्रिकालज्ञानी आहेत तसेच आत्मज्ञानीही आहेत. देव, दानव व मानव यांना त्यांच्याबद्दल आदर आहे. दुःखी कष्टी जीवांबद्दल त्यांच्या हृदयात अनुकंपा आहे. ब्रह्मदेवांनी जेव्हा जगाची निर्मिती केली तेव्हा त्यांच्या श्वासातून नारदमुनींची निर्मिती झाली म्हणून ब्रह्मदेवांच्या मानसपुत्रांपैकी ते एक आहेत. अशा या नारदमुनींनी केवळ ८४ सूत्रांमध्ये भक्तिशास्त्र सांगितले असून ही सूत्रे श्रीनारद भक्तिसूत्रे या नावाने प्रसिद्ध आहेत.

श्री. म. वि. केळकर (बी-३८, कमलपुष्प सोसा., वांद्रा रेक्लमेशन (प.), मुंबई - ४०० ०५०. दूरध्वनी २६४२९६६०) यांनी हा ग्रंथ (पृ. २८८, मूल्य अवघे रु. १२०/-) लिहिला असून त्रिदल प्रकाशनाच्या श्रीमती स्नेहकल टिळक (राणी बिल्डिंग, प्रार्थना समाजजवळ, गिरगाव, मुंबई- ४०० ००४. दूरध्वनी : २३८५ ०१९२) यांनी तो प्रकाशित केला आहे. या ग्रंथातील प्रकरणे अशी विषयप्रवेश, अध्याय - १. परमभक्तीची व्याख्या व स्वरूप, अध्याय-२ प्रेमरूपा भक्तीची साधने ३ प्रेमभक्तीचा महिमा, अध्याय - ४ मुख्य भक्त लक्षण, अध्याय - ५ उपसंहार. शिवाय यामध्ये दोन परिशिष्टे आहेत. १ श्री नारद भक्तिसूत्रे - क्रमपाठ. २ श्रीनारद भक्तिसूत्रे वर्णानुसार सूची.

प्रस्तावनेमध्ये श्री. केळकर म्हणतात 'श्री नारद भक्तिसूत्रांवरील श्रद्धेय हनुमानप्रसाद पोद्दार यांचे 'प्रेम-दर्शन हे पुस्तक मी १९८७ साली वाचले. नारदांची सूत्रे व त्यांचे त्यांनी केलेले विवरण मला अतिशय आवडले. त्यांच्या आधीच्या वर्षी म्हणजे १९८६ मध्ये आश्विन कार्तिकातील काकड आरतीच्या वेळी मालाडला पू. बाबांनी (प्रा. के. वि. बेलसरे) नारद भक्तिसूत्रांपैकी काही सूत्रांवर प्रवचने केली होती (१९८६ ते १९९०) पण ती ऐकण्यास मी गेलो नव्हतो पण त्या प्रवचनांच्या कॅसेटस् ऐकून ह्या पुस्तकाची निर्मिती केली (पू. बाबांशी काही साधकांनी ज्या चर्चा केल्या त्याचाही उपयोग झाला).

'श्री नारद भक्ती सूत्रांचे हे विवरण मुख्यत: पू. बाबांच्या प्रवचनानंतर आधारलेले असल्यामुळे साहजिकच त्यात सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या चरित्राला, बोधवचनांना व शिकवणुकीला प्राधान्य आहे विवरणात जेथे जेथे महाराज हा उल्लेख आहे तेथे तेथे तो सद्गुरु श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा आहे हे वाचकांनी कृपया लक्षात ठेवावे. नारदांनी या भक्तिसूत्रांमध्ये भक्तीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. सूत्रांचा पदच्छेद व अर्थ देताना व्याकरणाच्या रूपांनुसार शब्दश: अर्थ केला तर बोजड होईल म्हणून व्याकरणाला चिकटून न राहता थोडे स्वातंत्र्य घेऊन अर्थ सोपा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.'

पृ. २७८ वर लेखकाने संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे. जिज्ञासू वाचकांसाठी ती पुढे देत आहे.


१. 'श्रीनारद-भक्तिसूत्रे' ले. चं. वा. दांडेकर. सारथी प्रकाशन, पुणे (१९८७).

२. 'नारद भक्तिसूत्र विवरण' - ले. ह.भ.प. धुंडामहाराज देगलूरकर. प्रका. भानुदास देगलूरकर. धुंडामहाराज मठ. पंढरपूर. शके १९२०.

३. 'नारद भक्तिसूत्र रहस्य' - ले. वि. चि. केळकर. अधात्म्य परिषद, सांगली १९६७.

४. 'प्रेमदर्शन - देवर्षि नारद' रचित भक्तिसूत्र. ले. हनुमान प्रसाद पोद्दार, गीता प्रेस, गोरखपूर. संवत २०४१

५. 'नारद-भक्तिसूत्र' - ले. स्वामी वेदानानंद. रामकृष्ण मठ, नागपूर.

६. 'नारद भक्तिदर्शन' - ले. स्वामी अखंडानंद सरस्वती प्रका. सत्साहित्य प्रकाशन ट्रस्ट, मुंबई - ४०० ००६.

७. Love Divine 0 Narada Bakti Sutra by Swami Chinmayanand - Chinnaya Publication Trust; Madras - 600003.

८. The Gospel of Divine Love or Narada Bhakti Sutras by Swami Tyagishananda, Shri Ramkrishna Math, Madras - 600004.

## 'गुणदोषांचे भांडार अर्थात महाभारत' प्रकाशित

डोंबिवली येथील एक प्रसिद्ध लेखिका श्रीमती शैलजा गजानन दीक्षित (आनंदवन को.ऑ.हौ.सो. आर.वी.आय. कॉलनी, आयरे रोड, डोंबिवली (पू.) - ४२१२०७; दूरध्वनी : ९५२५१-२८८४३७६) यांचे गुणदोषांचे भांडार अर्थात 'महाभारत' हे पुस्तक (पृ. १७७, मूल्य रु. ९०/-) नुकतेच प्रकाशित झाले आहे.

येथील एक डॉ. वा.शा. खटकळ यांच्या हस्ते हे पुस्तक प्रकाशित झाले. त्याप्रसंगी ते म्हणाले, 'भगवद्गीता भगवान श्रीकृष्णाने सांगितली संस्कृतात. श्री ज्ञानेश्वरमाऊलींने प्राकृतात उतरवली आणि श्रीमती दीक्षितांनी ही गीत गीतामृताची अमृतपोई सामान्यांसाठी सोप्या मराठीत उपलब्ध करून दिली आहे. नित्य वापरातील साध्या शब्दरचनेतून सर्वसामान्यांच्या हृदयाची पकड घेण्याच्या ताकदीमध्ये ह्या गीत-गीतेची महानता आहे. येथील प्रसिद्ध लेखिका सौ. प्रतिभा बिवलकर यांची प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. त्यात त्या म्हणतात,

'गीता अखिल वेदवाङ्मयाचे सार आहे. महाभारत म्हणजे जीवनवेद आहे. जीवनाचे तत्वज्ञान सहजपणे सांगणारा हा ग्रंथराज आहे. रामायण ही एका व्यक्तीची शोकांतिका तर महाभारत ही एका कुटुंबाची शोकांतिका आहे. हा ग्रंथ म्हणजे मूळ कथेला असंख्य उपकथांनी जोडलेला प्रदीर्घ ग्रंथ आहे. तो मूळचा काव्यबद्ध ग्रंथ आहे. त्यातला एक-एक प्रसंग किंवा कथानक घेऊन त्यावर १०१ कविता श्रीमती दीक्षित यांनी रचल्या आहेत. (गद्यकाव्य प्रकारचे हे काव्य आहे.) महाभारत हे साहित्य रसिकांना पुरून उरणारे आहे. अशा महान ग्रंथावरील गद्यकाव्याचे वाचक स्वागत करतील, अशी आशा आहे.'

श्रीमती शैलजा दीक्षित यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा.

## वाचनीय पुस्तक 'तिसऱ्या महायुद्धाच्या टोकावर'

धनंजय राजे (मुचकुंद, ६७/७०२, वसंतविहार, ठाणे (प.) - ४०० ६०१. दूरध्वनी - २५४१४८८५) या नव्या लेखकाचे हे पहिलेच पुस्तक (पृ. ९७. मूल्य रु. ८०/-) सध्या अमेरिका-इराक युद्ध चालू आहे. बारा वर्षापूर्वी असेच अमेरिका-इराक हे आखाती युद्ध झाले होते. ४३ दिवसानंतर इराकच्या शरणागतीने ते संपले. आताचे हे युद्ध किती दिवसानंतर संपणार आहे कोण जाणे?

कर्नल अनिल आठल्ये यांची प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. त्यात ते म्हणतात, 'मराठीत या युद्ध विषयावर फारसे लेखन नाही.' अशा परिस्थितीत तिसऱ्या महायुद्धाच्या टोकावर हे छोटेखानी पुस्तक म्हणजे या विषयाच्या दुष्काळात पावसाची एक सरच ! मराठीत काकासाहेब खाडिलकरांची पहिल्या महायुद्धावरची भाष्ये किंवा कै. गो.ग. लिमये यांचा अपवाद वगळता तत्कालिन युद्धांवरती विशेष काम झालेले नाही. कै. दि.वि.गोखले यांनी पत्रकारिता हा विषय समर्थपणे मांडला परंतु तोही अपवादच. अशा स्थितीत धनंजय राजे यांचा हा प्रयत्न स्तुत्य आहे.'

दोन भागात या पुस्तकाची मांडणी आहे. पहिल्या भागात युद्धमीमांसा, युद्धाची पार्श्वभूमी इ. सहा प्रकरणे व दुसऱ्या भागात युद्धाची ठळक वैशिष्ट्ये, महत्वाच्या व्यक्तिरेखा इ. आठ प्रकरणे आहेत. वॉशिंग्टन पोस्ट, टाईम,

न्यूजवीक गल्फ टाईम्स, इकॉनॉमिस्ट इ. नियतकालिके व युद्ध कालीन इतर वृत्तपत्रे यांचा अभ्यास करून हे पुस्तक लिहिण्यात आलेले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासकांना हे पुस्तक उपयोगी पडेल, असा विश्वास वाटतो. श्री. राजे यांचे अभिनंदन.

## साहित्य जगत

### 'मनगंध' सौ. माधवी घारपुरे यांचा कथासंग्रह

डोंबिवली येथील एक प्रसिद्ध लेखिका सौ. माधवी ओंकार घारपुरे (धनंजय सोसा. ब्लॉक नं. ९, आर.पी. रोड, रामनगर, डोंबिवली (पूर्व). फोन नं. २८६२५११ यांचा 'मनगंध' हा कथासंग्रह येथील एक नामवंत प्रकाशक श्री. श्रेणिक अन्नदाते (सुमेरु प्रकाशन, डी-६, 'राजहंस' सोसा. टिळकनगर, डोंबिवली - पूर्व - ४२१२०१, दूरध्वनी - २४३५९६८) यांनी प्रकाशित केला आहे. (पृ. ९६ मूल्य रु. ४८/-)

आपल्या या पुस्तकातील मनोगतात लेखिका म्हणते - 'कथांकडे पाहून सिंहावलोकन करताना कथेतील पात्र आदर्शवादी अथवा आदर्शवादाकडे झुकलेली वाटतीलही, कदाचित. पण त्या त्या व्यक्तींची वृत्ती आजही सभोवती अनुभवास येते. कथा लिहिताना काही घटनांचे धागेदोरे मिळाले, काही अनुभवाची सूत्रे हाती आली. काही वृत्ती मनात घर करून राहिल्या. त्या अनुभवांनी मला अस्वस्थ केलं, म्हणण्यापेक्षा लिहितं केलं म्हणणं उचित ठरेल. ओढून ताणून आदर्शवादाची झूल कुणालाच पांघरायची गरज भासली नाही....'

या कथासंग्रहात एकूण दहा कथा आहेत. या सर्व कथांना विविध संस्थांची / नियतकालिकांची पारितोषिके मिळालेली आहेत. सौ. घारपुरे यांचे अनेक नियतकालिकातून विविध प्रकारचे लेखन नियमितपणे प्रसिद्ध होत असते. त्यांनी स्वलिखित कथाकथनाचे आजवर १२५ हून अधिक कार्यक्रम सादर केले आहेत.

•••

### ग्रंथप्रसारक शरद जोशी यांना 'संत नामदेव' पुरस्कार वितरित.

डोंबिवली येथील एक ज्येष्ठ ग्रंथप्रसारक शरद जोशी यांना संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व लेखक श्री. वामनराव देशपांडे पुरस्कृत संत नामदेव पुरस्कार दादर, मुंबई - २८ येथे झालेल्या एका कार्यक्रमात देण्यात आला.

दादरच्या आयडिअल बुक डेपोच्या वतीने दरवर्षी उत्तम वाचक पुरस्कार दिला जातो. यंदाचा हा पुरस्कार वितरण समारंभ दादरच्या धुरू हॉलमध्ये नुकताच पार पडला. लोकसत्तेचे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते प्रथम पुरस्कार (दहा ग्रॅमची सुवर्णमुद्रा) सांगलीच्या सदानंद रघुनाथ कदम यांना देण्यात आला. प्रसिद्ध कवी अशोक नायगांवकर यांच्या हस्ते, द्वितीय व तृतीय पुरस्कार अनुक्रमे डॉ. उर्मिला चाकूरकर (पैठण) व प्रा. अल्ताफ खान (सावंतवाडी) यांना देण्यात आले. याच कार्यक्रमात शरद जोशी यांना त्यांच्या ग्रंथप्रसार कार्यासाठी संत नामदेव पुरस्कार (शाल, श्रीफळ व रु. १,०००/- रोख) केतकरांच्या हस्ते देण्यात आला.

कवी नायगांवकर यांनी आपल्या भाषणात भाषा संकुलात आदान-प्रदान होण्याची आवश्यकता प्रदान केली. अध्यक्षपदावरून बोलताना कुमार केतकर यांनी अमेरिकेतील वाचन, संस्कृती व आपली वाचन संस्कृती यांची तुलना करून वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्याची व भारतीय भाषांमध्ये आदान-प्रदानाची खूप गरज असल्याचे सांगितले. उत्तरा मोने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आयडियल बुक डेपोचे कांताशेठ नेरुरकर, वामनराव देशपांडे व्यासपीठावर उपस्थित होते. मुंबईतील 'राजा प्रकाशना'चे ज्ञानेश्वर मुळे, 'आपलं प्रकाशना'चे रवीन्द्र माहिमकर, 'त्रिदल प्रकाशना'चे स्नेहल टिळक, 'साहित्य' त्रैमासिकाचे माजी संपादक श्री. मल्हार टगे आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

•••

# श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १४ वा) ॥ गुणत्रयविभाग योगः ॥

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १४ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

तेराव्या अध्यायाचाच हा उत्तरार्ध आहे. 'क्षेत्र-क्षेत्रज्ञ हाच विषय येथे सविस्तर समजावून सांगितला आहे. सर्व ज्ञानातील उत्तम ज्ञान मी तुला पुन्हा सांगतो, असे म्हणून भगवंतानेच अर्जुनाला सांगण्यास सुरवात केली आहे. बरं का अर्जुना, हे ज्ञान जाणूनच सर्व मुनी या संसारातून सुटून परम श्रेष्ठ, गतीला गेले आहेत. या ज्ञानाने मद्‌रूप झालेले पुरुष सृष्टीच्या उत्पत्तीकाळी जन्मत नाहीत व प्रलय काळी विनाश पावत नाहीत. तेराव्या अध्यायाच्या समाप्तीला भगवंताने म्हटले होते की क्षेत्र-क्षेत्रज्ञ यातील अंतर आणि प्रकृतीच्या विकारांपासून सुटण्याचा उपाय 'जे पुरुष तत्वत: जाणतात ते ज्ञानी पुरुष परमात्म्याला प्राप्त होतात.' या अध्यायात क्षेत्र-क्षेत्रज्ञातील अंतर सांगितले गेले पण प्रकृतीचे जे विकार (गुण) त्यापासून सुटकेचे मार्ग सांगायचेच राहिले.

मी क्षेत्र नाही, क्षेत्रज्ञ आहे. एवढे जाणण्याने प्रकृतीपासून सुटका होत नाही. तर प्रकृतीच्या विकारापासून सुटण्यासाठी ज्ञानाने, ध्यानाने, कर्मयोगाने हे ज्ञान मिळवायला हवे. त्यासाठी प्रत्यक्षात आचरण म्हणजेच कर्मयोग कसा हवा हे सांगण्यासाठी १४ व्या अध्यायाची योजना केली आहे.

गुण ते कैसे किती । बांधती कवणे रीती ।
ना तरी गुणातीतीं । चिन्हे काई ॥
एवं यया आघवेया । अर्था रूप करावया ।
विषो एथ चौदाविया । अध्यायासी ॥

ज्ञानेश्वरांनीही चौदाव्या अध्यायाचे हे प्रयोजन सांगितले आहे.

'कर्ता करविता तोच व फळही त्याचेच' या भावनेने केलेले कर्म म्हणजे कर्मयोग. अशी कर्मयोगाची सुटसुटीत व्याख्या सद्‌गुरु वामनराव पै यांनी केली आहे.

प्रकृतीचे घटक म्हणजेच त्रिगुण. या गुणांपलीकडे जाणे, गुणातीत होणे, हाच गीतेचा आदर्श आहे. गुणातीत होऊन भगवद्‌भाव कसा प्राप्त करावा, हेच या अध्यायाचे उद्दिष्ट आहे.

सत्व-रज-तम हेच ते त्रिगुण. सृष्टीच त्रिगुणात्मक आहे. कोणताही गुण गौण नाही. सर्वांचीच आवश्यकता आहे. सृष्टीत कुठल्याही वस्तूत एक किंवा दोनच गुण आहेत, असे कधीच नसते. प्रत्येकात तीनही गुण असतातच. फक्त प्रत्येक पदार्थात त्यांचे प्रमाण कमी अधिक असते. (म्हणूनच व्यक्ती तितक्या प्रकृती असतात.)




ब्रह्मतत्वाचा शोध घेताना अनुभव व आनंद घेणे म्हणजेच गुणातीत होणे. विनोबाजींच्या भाषेत आत्मा देहापासून अलग करणे. प्रकृतीच्या लीलेकडे (मायेकडे, खेळाकडे) साक्षीत्वाने बघणे. स्वत:च स्वत:कडे त्रयस्थासारखे बाहेरून बघणे. देहाची सुख, दु:ख हा प्रकृतीच्या गुणांचा खेळ आहे. आत्म्याचा त्याच्याशी

काहीही संबंध नाही. म्हणून त्या आत्म्याला देहापासून अलग करून त्याला नाटकाच्या प्रेक्षकासारखे साक्षीभावाने देहाकडे (सुख-दु:खाकडे) बघायला लावणे. आपण नाटक बघतो त्यावेळी त्या पात्रांच्या सुख दु:खाशी आपण समरस होतो पण मी म्हणजे ती पात्रे नाही. मी वेगळा आहे. प्रेक्षक आहे हे भान ठेऊन बघतो. यालाच साक्षीभावाने पहाणे म्हणतात. तसे आपण देहाकडे बाहेरून बघायला हवे. विनोबाजींनी येशूख्रिस्ताचे दिलेले उदाहरण याबाबतीत पुन्हा उल्लेखण्यासारखे आहे. येशूला क्रूसवर चढवून हाता-पायाला खिळे ठोकले त्यावेळी त्याला आत्यंतिक वेदना झाल्या असतील. तो एकदम ओरडला 'हे काय करता?' पण क्षणभरातच तो म्हणाला, 'देवा, ह्या लोकांना क्षमा कर. हे अज्ञानी आहेत. आपण काय करतो ते त्यांना समजत नाही.' आत्म्याला देहापासून असे अलग करता आले तर सुख दु:खे देहाची मी त्यापासून मुक्त आहे ही जाणीव होईल. ज्ञानेश्वरांदीना संन्याशाची पोरे म्हणून समाजाने छळले त्यावेळी असेच उद्‌गार त्यांनीही काढले होते. आत्मज्ञानी लोक त्रिगुणातीत असेच असतात.

तिसऱ्या अध्यायातही त्रिगुणांचा उल्लेख (२७ ते ४३) आला आहे. रजोगुणांचे सुपुत्र काम-क्रोध हे महाखादाड व पापी असतात. त्यांना तू आपले शत्रू समज. त्याला ठार मारून टाक. देहापेक्षा इंद्रिय हे श्रेष्ठ इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ- मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ. बुद्धीपेक्षा आत्मा श्रेष्ठ हा तत्व क्रम जाण.

माझी पत्नी महत्-ब्रह्म. तिच्या ठिकाणी मी गर्भस्थापना करतो. त्यानंतर सर्व भूतांची उत्पत्ती होते. या सृष्टीत नाना प्रकारच्या योनींची नाना शरीरे जन्मास येतात. ही महत योनी (विश्वयोनी जगदंबा) हीच सर्वांची माता आणि बीज स्थापन करणारा मी पिता. आदी पुरुष आदिमायेचा स्वीकार करतो. आत्म पुरुषाचा स्वसंकोच हीच माया-प्रकृती वेदान्ताने याला 'अज्ञान' स्वरुपाचा विसर म्हटले आहे. या स्वरुप क्रम संकोचाने नानाविध योनी निर्माण झाल्या. सर्वांत शेवटचा क्रम संकोच पृथ्वी म्हणजे दगड. या गोष्टीमुळे आत्म्याने आपले ज्ञान-अनंतता - चैतन्यमयता-मुक्तता गमावली आणि अमर्याद गुण व असंख्य आकार त्याबदल्यात कमावले. इथे चैतन्य पूर्णपणे कमळ मिटावे तसे मिटते. लोप पावते. 'विष्णुची निद्रा' म्हणजे स्वरुपाचा विसर. या अक्षर पुरुषाला अव्यक्त म्हणतात. हाच ईश्वर. हे अज्ञान जीवाचे नाही ईशाचे आहे. ईश्वराला झालेले अहंकाराचे स्फुरण म्हणजे अज्ञान.

मग मिटलेल्या चैतन्य कमळाची कळी हळूहळू उमलत जाते. पृथ्वीतून वनस्पती-कीटक-पशूपक्षी असा क्रम विकास होतो. मानव हा मनाच्या पातळीवर जगणारा प्राणी. यापुढील विकसन मन-बुद्धी-अहंकार अशा सूक्ष्म पातळीवरून होतो. याला चैतन्याचा क्रम, विकास म्हणतात. अशा क्रम विकास व क्रम संकोचाच्या लक्षावधी स्तरांना योनी म्हणतात. योनी म्हणजे जाती. नानाविध आकार व नानाविध गुण असलेली ही प्रकृती. यात चैतन्याचा हळूहळू लोप होतो. ही प्रकृती सत्व-रज-तम या त्रिगुणांची बनलेली. हे त्रिगुण प्रकृतीतूनच निर्माण होतात. आणि हे त्रिगुणच चैतन्याला (क्षेत्रज्ञाला) देहाच्या बंधनात अडकवतात. अज्ञानाच्या कार्यास अशी सुरवात होते. पुढे मन-बुद्धी-अहंकार इ. आठ विकारांच्या साहाय्याने त्रिगुणात्मक अशा अनेक ब्रह्मांडाची उत्पती होते. हे जग हा त्यातलाच भाग.

या दृश्यमन विश्वाच्या (सृष्टीच्या) रुपाने मीच सर्वत्र ओतप्रत भरून आहे. त्यावेळी जीव स्वत:ला ओळखत नाही, त्यावेळी तो अज्ञानाला वश होऊन देह म्हणजे मी, जन्ममरणादी देहाचे धर्म माझेच आहेत असे मानू लागतो. (जीवाला ज्यावेळी आपल्या मूळ स्वरुपाची जाणीव होते. त्यावेळी दृश्य रूपाने प्रतीत होणारे हे जग मावळते.) विनोबाजी नेहमी एका वैद्याचे उदाहरण देतात. वैद्य रोग्याची प्रकृती तपासतो. रोगाचे निदान करतो व उपाय सांगतो. त्याप्रमाणे भगवंतांनी

सर्वांच्या प्रकृती तपासून रोग कोणता जडलाय ते सांगून उपाय पण सांगितले आहेत. सर्व प्रकृतीत हे सत्व-रज-तम (आयुर्वेद त्याला कफ-पित्त-वात म्हणते). हे त्रिगुण भरलेले आहेत. सर्वात या तीन वस्तू (गुण) आहेतच. फक्त कमी जास्त फरकाने. देहापासून आत्मा अलग करायचा म्हणजे हे त्रिगुण निग्रहाने जिंकून त्या परमात्म्याकडे पोचायचे.

सत्व-रज-तम या तीन गुणांमुळे जीव पुढील जन्मासाठी बांधला जातो. विश्वाच्या घडामोडी या त्रिगुणांमुळेच होतात. हे त्रिगुण एकत्र दिसत असल्यामुळे वेदान्ताने त्याला 'प्रकृती' म्हटले आहे.

'गुणा गुणेषुजायन्ते तत्रैव निविशन्तिच ।'

महा. शांतिपर्व ३०५.२३

गुणातच गुण उत्पन्न होतात आणि त्यातच लय पावतात.

तमोगुणाची ठळक वैशिष्टे - स्थिरता (साकारता) जडता, मूढता, आळस, निद्रा, अज्ञान.

रजोगुणाची ठळक वैशिष्ट्ये - गतिमानता, चंचलता, परिवर्तन, विकसनशीलता, अस्थिरता, कर्मासक्ती

सत्वगुणाची ठळक वैशिष्ट्ये - ज्ञान, सुख, पावित्र्य, विवेक, वैराग्य, अहम्

साऱ्या जडचेतन वस्तू आपापल्या प्रकृतीने घडतात. यालाच स्वभाव म्हणतात. गुणच गुणात कार्य करतात हे द्रव्य ज्यावेळी जाणतो त्यावेळी तो गुणातीत होऊन भगवद्भाव प्राप्त करून घेतो. प्रत्येक वस्तूचा विकास स्वभावाने होतो. मानवी प्रकृतीही त्रिगुणात्मक. पेरलेल्या आत्म्याचा विकास स्वभावानुसार होतो. पण त्या विकसनाला वाव देणे, खतपाणी घालणे, योग्य वातावरण निर्माण करणे ही गीतेची शिकवण आहे. मग तो आंबा (पेरलेला) असो वा मोगरा असो वा मानव कुणीही असो. वस्तूचे विकसन योग्य मार्गाने होण्यासाठी काळजी घेणे आवश्यक. आणि तेच मार्गदर्शन गीता करते. आपण सूर्याप्रमाणे कर्मांचे प्रेरक आहोत, कर्ते नाही.

आत्मा हा स्वयंपूर्ण आहे. त्याची स्वाभाविक गती उर्ध्वगामी आहे. परंतु एखाद्या वस्तूला (उदा. फुगा) खाली जड वस्तूत लावले तर ती वस्तू खाली खेचली जाते. फुग्याला मांजर कुत्र्याचा आकार देऊन वजन म्हणून जाड पुठ्ठ्याचा तुकडा लावतात मग तो वर न जाता खाली उभा रहतो. त्याप्रमाणे आत्म्याला देहाचे ओझे खाली खेचते. मुक्ताबाई वीजेसारखी आकाशात नाहीशी झाली. तुकाराम महाराजही असेच पाहता पाहता नाहीसे झाले. (त्यांना न्यायला स्वर्गातून विमान आले होते ही काल्पनिक गोष्ट आहे.) त्यांनी आत्म्याला देहापासून अलग केले हे खरे कारण असावे.

देहापासून आत्म्याला अलग करणे जमले तरच प्रगती होणे शक्य. म्हणून आत्म्याच्या पायातली देहाची बेडी आपणच तोडायला हवी. मग माणूस देह दुःखाने दुःखी होणार नाही. देहाची आत्म्यावरील सत्ता नेस्तनाबूत करा. हे विवेकाचे व निग्रहाचे काम आहे. विनोबाजी म्हणतात, होडी वल्हवायला वल्ही लागतात पण दिशा ठरवायचे काम सुकाणुचे असते. म्हणून वल्ही व सुकाणू दोन्हीही आवश्यकच. तसेच देहाच्या सुख दुःखापासून आत्म्याला अलग करण्यासाठी विवेक व निग्रह दोन्ही जरुरी आहेत.

आता प्रकृतीच्या त्रिगुणांपैकी प्रत्येकाची क्रमविकासाच्या दृष्टीने तमोगुण-रजोगुण-सत्वगुण अशी क्रमरचना करून त्यांची माहिती करून घेऊया. तमोगुण म्हणजे प्रमाद. रजोगुण म्हणजे प्रवृत्ती व सत्वगुण म्हणजे प्रकाश. आपले जीवन व हे सृष्टीचे चक्र त्रिगुणात फिरत आहेत.

त्रिगुण म्हणजेच प्रकृती. सृष्टी किंवा निसर्ग. विकसित होण्याची निसर्गाची स्वत:ची अशी गती आहे आणि त्या विकासाचा काळ अमर्याद आहे म्हणून आपण फक्त मानवी जीवनाच्या दृष्टीने त्रिगुणांचा विचार करू. देह व इंद्रिये हा तमोगुण. मन, बुद्धी, अहंकार हा रजोगुण व ज्ञानाची लालसा हा सत्वगुण.

**तमोगुण -** जडता, मूढता, स्थिरता, ज्ञानशून्यता ही तमोगुणाची वैशिष्ट्ये. सत्व व रजोगुणाला दाबून तमोगुण प्रगट होते. त्यावेळी सत्वाचे ज्ञान व रजाची गती दृगोचर होत नाही. सर्व देह व स्थूल आकार तमोगुणामुळेच आहेत. तमोगुणामुळेच आकार दिसतात. नाहीतर दिसणार नाहीत. स्थिरता जडता व गतिशून्यतेमुळे आकार तयार होतात. स्वत:हून जागचा हलणार नाही. दगड कसा उचलून फेकावा लागतो. अज्ञानातून याची निर्मिती होते. प्रमाद, आळस, निद्रा, अज्ञान, जडता, मूढता, स्थिरता, मोह हे तमोगुणाचे स्थायीभाव.

अप्रकाशोऽ प्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ॥ १४.१३

तमोगुणाची वृद्धि झाली असता काहीच करू नये असे वाटणे, अज्ञान, प्रमाद म्हणजे कर्तव्याचा विसर आणि मोह हे दोष माणसाला ग्रासतात.

तमोगुण वाढला असतांना मृत्यू आला तर मूढ योनीत म्हणजे पशूपक्षी कृमी कीटकाचा जन्म येतो. हा तमोगुण नीच गुणांनी युक्त असला तरी ह्या तमामुळेच रजाच्या विकासाला वेसण घातली जाते. अतिगतिमानता याचा परिणाम वाढ. या रजाला जर तमाने दाबले नसतेना तर खूप मजेदार प्रसंग घडले असते. रजाची गती तमाने मर्यादित केली नसती तर काहीच जागेवर राहिले नसते. विश्वातील साऱ्याच वस्तू जाताना फिरतच रहावे लागले असते. आपण स्वत:, घरदार, भांडीकुंडी, गाव, रस्ते, वाहन, नद्या, पर्वत काहीच जागी स्थिर राहिले नसते. मग सारेच एकमेकांवर आपटले असते. (जगात कोणीच हे बघायला जिवंत राहिले नसते.) तमोगुणात ज्ञान लोप पावले आहे म्हणून वस्तू दिलेल्या आकारात राहते. गतीचा म्हणजे रजोगुणाचा लोप म्हणून वस्तू ठेवू तेथे त्याच स्थितीत राहते. टेबल, खुर्च्या, सोफे, जागेवर राहतात. पुस्तके टेबलावर राहतात. मुख्य घर जागेवर राहते. गतीमुळे विकास म्हणजे वाढ होते. हाही रजाचा गुण. तमामुळे वाढीला मर्यादा पडते. नाहीतर वेलुच वृक्ष पण गगनावेरी वाढले असते. माणसे घरात, वाहनात मावली नसती त्यांची उंची पण आभाळा एवढी वाढतच गेली असती. मग घरे, वाहने, कपडे कोणत्या मापाचे बनवले असते ! माणसाचे दात तोंडाबाहेर लोंबले असते केस तर रस्त्यावर लोळले असते. नखे वाघ नखांना लाजवणारी झाली असती. काय मजाच मजा आली असती मग ! कल्पना करा अशी दुनिया राहिली असती तरी का जिवंत ! तमामुळे वस्तूला, मानवाला विशिष्ट वाढीनंतर मर्यादा पडते. त्यामुळे आकाराचे सौंदर्य दृष्टीस पडते.

तरीपण तमाला दाबून रज प्रबळ होतो तेव्हा वनस्पती झाडे, वेली (स्थिर असतात पण हलतात जागेवरच.), पशूपक्षी दिसतात. पशूपक्ष्यांची जीवनात गती आहे पण निवड वा बदल करण्याचे गुण नाहीत.

माणसात तमोगुण प्रधान असतो तेव्हा ती माणसे आळशी, मट्ठ, अज्ञानी, ज्ञानशून्य, निद्रेत बुडलेली, जागची न हलणारी अशी पशूवत जीवन जगणारी असतात. तमोगुणाच्या प्राबल्यामुळे त्यांना कळते पण वळत नाही. त्यामुळे गुण गंजून तमामुळे ते अध:पतित होतात. तमोगुण मानव देहात शिरण्यासाठी टपूनच बसलेला असतो. तरुणपणी पैसा मिळवून ठेऊन माणूस म्हातारपणची बेगमी करतो. म्हणजे पुढच्या आळसाची तयारी करून ठेवतो. विनोबाजी म्हणतात, म्हातारपणी नुसतं बसायचं कशाला? तेव्हा तुम्ही अनुभवी होता तर तुम्ही जगाला त्या ज्ञानाचा फायदा करून दिला पाहिजे. आळस हेच खरे माणसाच्या दु:खाचे कारण आहे. आळसाला दूर ठेवा. सारा वेळ कामात

व्यस्त रहा त्यामुळे म्हातारपणी स्वास्थ टिकून राहील, असे तमोगुणाला जिंकता येईल.

भगवंत म्हणतात, तमोगुणी माणसाला पुढचा जन्म मूढ योनीत सुस्त अजगराचाच योग्य आहे. कारण आयुष्य आळसात घालवणाऱ्याला तेच संस्कार होऊन पुढील प्रवासाला सुरुवात होते. तमोगुणाचा प्रभाव ज्ञानाला आवरण घालतो.

**रजोगुण**-विलक्षण कर्ममयता, अचाट गतिशीलता, आकर्षण, आसक्ती, लोभीपणा, चंचलता, लालची ही रजोगुणाची लक्षणं. सत्व व तमाला दाबून हा वाढत असतो. रजोगुण वाढला असता दुःखच वाट्याला येते. रजोगुणात जर मृत्यू आला तर त्याला कर्मासक्ती असणाऱ्या मनुष्य लोकात किंवा राबराब राबणाऱ्या पशू-पक्ष्यांच्या योनीत जन्म येतो. रजोगुण तमाचे दुसरे टोक. एकाला स्वस्थ बसवत नाही तर दुसऱ्याला जागचे हलवत नाही.

रजोगुण सत्व तमाला दाबून वाढतो त्यामुळे ज्ञान व स्थिरता अप्रगट राहून फक्त गती प्रगट होते. जगातील कोणतीही गोष्ट स्थिर नाही. सृष्टी परिवर्तनशील आहे. परिवर्तन हा जगाचा नियम आहे. म्हणून ऋतू बदलतात, दगड फुटतात, ताजा पदार्थ शिळा होतो, वस्त्र जीर्ण होते. जन्माला आलेले बाळ तरुण-वृद्ध होते. ही सारी रजाची गती, त्याचा प्रभाव. जगतचा अर्थ जे गतिमान आहे ते. जगात जर फक्त तमोगुण असता तर जग ठप्प राहिले असते. कशाचीही वाढ, विकास, परिवर्तन झाले नसते. जर केवळ रजोगुणच असता तर जागेवर काहीच दिसले नसते तर सारं जग 'पळा पळा कोण पुढे पळे तो' करत भ्रमण करत राहिले असते. (सर्व वस्तु मात्र व प्राणी मात्रासह सर्व सृष्टी) कोणताही आकार दिसला नसता. सगळेच धुळीने भरलेले आकाश दिसले असते. (पण पहाण्यासाठी कोणी राहिलेच नसते ना!)

'लोभ: प्रवृत्तिरारम्भ: कर्मणामशम: स्पृहा ।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥ १४.१२

भरतश्रेष्ठ अर्जुना, रजोगुण वाढला असता लोभ, कर्मांकडे प्रवृत्ती व त्यांचा आरंभ, अतृप्ती व इच्छा हे विकार उत्पन्न होतात.

तमोगुणामुळे स्थिरता दिसत असली तरी विश्वात तमोगुणाचा आभास आहे. अत्यंत गतिमानता स्थिरतेचा आभास निर्माण करते. गाडीचे वेगाने फिरणारे चक्र, गरगर फिरणारा भोवरा आपल्याला स्थिर वाटतो. एवढी पृथ्वी स्वत:भोवती फिरत सूर्याभोवती कमालीच्या वेगाने फिरतेय तरी आपल्याला कुठे जाणवतेय ! अत्यंत गतिमानता हा स्थिरतेचा आभास आहे. वेदाने जगतालाच आभास म्हटले आहे. इथे कोणताही पदार्थ स्थिर नाही. पापणी फडकते तोवर परिवर्तन होते. वर्तमान भूतात जमा होतो. म्हणूनच 'सर्वम् क्षणिकम्, सर्वम् क्षणिकम्' असे गौतम बुद्धांनी म्हटलेय. रजोगुणामुळे मायेला क्षणभंगुरता आलीय. रजोगुणाचा परिणाम दुःखच. 'जन्मते इथे मरण्यासाठी । फुले उमलती सुकण्यासाठी ॥ तसेच 'वियोग भीती इथे प्रीतीला । शाप विनाशी सौंदर्याला ॥' अत्यंत सौख्याच्या क्षणीही पुढे दुःख तर पदरी येणार नाही ना हा विचार अस्वस्थ करतो.

रजोगुणाचे प्रमुख लक्षण म्हणजे अचाट कर्मांची अफाट आसक्ती. त्यामुळे लोभात्मक कर्मासक्ती निर्माण होते. मग वासना अनावर होतात. समुद्र बुजवावा व वाळवंटात जलाशय निर्माण करावा असे वाटते. डोंगर फोडायचा आणि खळगा भरायचा, असे उद्योग उचापती कराव्याशा वाटतात. हे फोड ते जोड. ते उडव ते घडव. हे त्यात मिसळ ते ह्यात मिसळ असे नाना उपद्व्याप मग सुचतात. जे नाही ते करायला धजावचे. मग त्याला माशासारखे पाण्यात रहावे वाटते. पक्षासारखे उडावे वाटते. जे जेथे आहे ते तेथे त्याला पहावत नाही. सृष्टीची

उत्खननशास्त्र करण्यात त्याला सार्थकता वाटते. जमिनी खणून त्यात सोने सापडते त्याचे तो दागिने घडवतो. मग कानाला, नाकाला भोके पाडून तो ते अलंकार घालतो. देह सजवतो. रजोगुणाचा हा प्रभाव.

चंचलता हाही रजाचाच गुण. त्याला तात्काळ फळ हवे. बी पेरताच झाड हवे फळ हवे. ही नोकरी सोड ती धर. ती धर ही सोड अशी सारखी धरसोडीची प्रवृत्ती. संयम, विवेकाचा अभाव. स्थैर्य नसल्यामुळे एका ठिकाणी पाय रोवून उभा रहात नाही. दहा दगडीवर एकदम पाय ठेऊ बघतो. त्यामुळे त्याची अशी स्थिती होते. यामुळे स्वधर्माचरण रहात नाही. गीतेतील कर्मयोग हा रजोगुणांवर तोडगा आहे, असे विनोबाजींचे मत आहे. पण हेही लक्षात ठेवले पाहिजे की अति किंवा अचाट कर्म म्हणजे खरा कर्मयोग नव्हे. सृष्टीत तर सारखेच कर्म चाललेले आहे पण विशिष्ट मनोवृत्तीने कर्म करणे म्हणजेच कर्मयोग आचरणे. धान्य फेकले तर वाया जाते पेरले तर उगवते. स्वधर्मात सर्व शक्ती खर्च कराल तर रजोगुणाची धावपळ कशाला होईल? मग त्याची नांगीच मोडेल आणि अशा रीतीने रजोगुण जिंकता येईल.

रजोगुणामुळेच माणूस कर्मशील राहतो हे खरे पण त्या कर्मांमुळे भोगही प्राप्त होतात. भोगामुळे आसक्ती, लालसा, लोभ वाढत जातो. अजून पाहिजे अजून पाहिजे अशी हाव सुटते. तृप्ती नाहीच. न शमणारी तृष्णा. ययातीने पुरुला वृद्धत्व देऊन त्याचे तारुण्य मागून घेतले. कारण तृप्त न होणारी कामेच्छा. यज्ञात अग्निला आहुती देऊन अग्नि जास्तच प्रज्वलीत होतो. त्याप्रमाणे काम भोगाने न शमता आणखी उद्दीपित होतो. मग अनैतिक मार्गानेही काम तृप्ती केली जाते. पण भोगाने काम जास्तीच प्रदीप्त होतो. (अर्थशास्त्रात 'A Law of diminishing utility' हा सिद्धान्त आहे. त्यात पहिल्या ग्लासनंतर कमी कमी होत जाणारी उपयुक्तता दाखवली आहे. माणसाला खूप तहान लागली तर पहिल्या ग्लासाने त्याची तृषा वाढते मग दुसरा ग्लास पितो. तृषा आणखी मागते. मग तिसऱ्या ग्लासनंतर चौथा, पाचवा त्याची उपयुक्तता कमी कमी होत जाते. पण हा सिद्धांत तृषा व भूकेच्या बाबतीतला आहे.) पण बाकी पैसा, सत्ता, स्थावर जंगमची मालकी यांची हाव वाढतच जाते. दोन बंगले असले तरी अजून चार हवेत. एक शेत असेल तर चार हवीत वाटते. दहा दागिने असले तरी आणखी दहा प्रकारचे हवे वाटतात. ज्ञानाचा उपयोग भोगासाठी करतो. तहानेसाठी तो बुद्धी लढवून नाना शीतपेये, दारू बनवतो. पशू फक्त पाणीच पितात. माणसाच्या ज्ञानाची शान वेगळीच.

मनुष्य रजोगुणामुळे पशू झाला नाही पण देव कोटीलाही गेला नाही. तो तमोगुणात उतरतही नाही व सत्वगुणात चढतही नाही. सत्वाला दाबून प्रबळ होणारा रजोगुण माणसाला असुरी भोग भोगायला उद्दीप्त करतो. अधोगतीला नेतो. क्रूर कर्मा बनवतो. सत्ता कीर्तीची लालसा त्याला समाजघातक व राष्ट्रघातक कृत्ये करायला भाग पाडते.

रजोगुणाचे आणखी प्रधान लक्षण म्हणजे अहंकार. रजोगुण म्हणजेच माणसाचे मन-बुद्धी-अहंकार हे माणसाला शरीराशी जखडून ठेवतात. इंद्रिय भोगासाठीच सारी शक्ती बुद्धी पणाला लावली जाते. रजोगुणी माणसे रजोगुणात जन्मतात. रजोगुणात वावरतात व मृत्यूनंतरही रजोगुणी म्हणूनच जन्म घेतात.

**सत्वगुण**-सत्व रज तमाला दाबून वाढतो. सत्व वाढल्यामुळे ज्ञान होते. हा सत्वगुण निर्मळ, प्रकाशक, व्याधीरहित सुख व ज्ञान प्राप्त करुनदेतो. सत्वाच्या प्राबल्यामुळे इंद्रियातून प्रकाश फाकतो. सुख लाभते. सत्वगुणांची वृद्धी झाली असता मृत्यू आला तर उत्तम धार्मिक कुलातच जन्म मिळतो. सत्वगुणी उर्ध्व गतीने जातात. तम व रजो गुणावर विजय मिळवून सत्वाला वाढवावा लागतो. ते वाटते तेवढे सोपे काम नाही. आळस,

निद्रा, मोह, अहंकार जिंकणे हे मनोनिग्रहाशिवाय शक्य नाही. इंद्रिये व मनावर तावा यासाठी प्रदीर्घ अभ्यास हवा. यासच योगाभ्यास म्हणतात. तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर हे महामानव वेगळे. पण सामान्य लोकांना सत्वगुण कमावण्यास तपस्या करावी लगाते. म्हणून या वाटेला फारसे लोक जात नाहीत. काहीच तपस्वी यशस्वी होतात. संताच्या सान्निध्याने किंवा सद्गुरुच्या कृपेने त्याची बरीचशी प्रगती होते. आघात संकटे यामुळे माणसे सत्वगुणाकडे वळतात. सत्कर्मांनी सत्वगुण वाढवता येतो. ही सत्कर्मे दोन प्रकारची.

१) अंतरंग शोधन म्हणजे योग.
२) निरंहकार, निष्काम स्वधर्माचरण.

या दोन्हीमुळे चित्तशुद्धी होते. बुद्धीला इंद्रियांचा वापर करता यायला हवा. इंद्रियांकडून बुद्धीचा वापर नको. सत्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शास्त्राला धरून आहार-विहार. प्रमाणबद्धता, संयमन व ज्ञानपूर्णता. पण सत्वगुणी व्यक्तीलाही शारीरिक विकार असतात. वृक्ष-वेलींना फुले फुलणे जेवढे नैसर्गिक तेवढेच तारुण्यात विकार उद्दीपीत होणे. संयम हाच खरा सत्वगुण. खूप खाणे जसे वाईट तसेच न खाणेही वाईटच. म्हणजे दोन्ही टोके नकोतच. 'मध्यम मार्ग' अवलंबण्यास गौतम बुद्ध सांगतात. रज-तम टोकाचे बिंदू ते दोन्ही नकोत. सत्वगुण समतोलात असतो. योग म्हणजे समतोल. ना भोग ना त्याग. त्यामुळे तो शांत, समाधानी, तृप्त असतो.

| | |
|---|---|
| तमोगुणाप्रमाणे तो निष्क्रिय नाही | सत्वगुणी संयम, विवेकाने भोग घेतो. |
| रजोगुणाप्रमाणे चंचल नाही | निरहंकार, निष्काम सत् कर्मे करतो. |

रज-तम - शारीरिक पातळीवरचे गुण

सत्व - (सूक्ष्म) मन बुद्धी अहंकारातून जन्मतो. तो आनंदी व उत्साही, प्रसन्न, आदर्श असा असतो.

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमिच्युत ॥ १४.११

ज्यावेळी इंद्रियात सर्वत्र प्रकाश म्हणजे निर्मळ ज्ञान उत्पन्न होते, तेजस्वीपणाचा प्रादुर्भाव होतो त्यावेळी देहात सत्वगुणाची वाढ झाली म्हणनू समजावे. शिवाजीमहाराज, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, योगी अरविंद हे गतजन्मीच्या तपस्येतून जन्मलेले महामानव.

पण भगवंत हेही सांगतात की सत्वाने ज्ञान होते, सुख मिळते पण त्यामुळे अहंभाव येतो. तो अहम् इंद्रियसुखात रमतो. त्यावेळी तो बंधनकारक होतो. परंतु ज्यावेळी अहंकारातून आत्म्याचा प्रकाश प्रगट होतो त्यावेळी तो सात्विक असतो. मग स्वार्थापेक्षा तो समाजकल्याण पाहतो. त्यामुळे ते अध्यात्मिक दृष्ट्या उच्च पातळीवर असतात. मृत्यूनंतर त्यांना उत्तम कुळात जन्म मिळतो.

मानवी प्रकृतीही त्रिगुणांचे मिश्रण घेऊन जन्मास येते. या प्रकृतीच्या त्रिगुणात्मक घटक प्रमाणालाच 'स्वभाव' म्हणतात. गीता यालाच 'अध्यात्म' म्हणते. या स्वभावाप्रमाणे अर्जुनाला ध्यान जमले नसते व बुद्धाला युद्ध जमले नसते. दोघे क्षत्रिकुळातलेच होते पण त्याचे स्वभाव भिन्न होते. म्हणून प्रत्येकाने आपल्या स्वभावानुसार स्व-धर्माची निवड करावी.

त्रिगुणातीत होणे म्हणजेच आत्मभावावर स्थिर होणे. स्वत: स्वत:स साक्षीभावाने पहातो त्यावेळी तो स्वरुपाचे ठायी स्थिर होतो. सूर्य हा पृथ्वीचा साक्षी भगवंत विश्वाचा साक्षी व आपण आपल्या देहाचे (क्षेत्राचे, प्रकृतीचे) साक्षी . असे साक्षी बनणे हाच आत्मभाव किंवा भगवद्भाव प्राप्त करणे होय. हा अनुभव आला तर जन्म,मृत्यू, सुख दु:खे आपली नाहीत प्रकृतीची आहेत हा

अनुभव येतो.

यानंतर अर्जुनाने भगवंताला गुणातीताची लक्षणे कोणती व गुणातीत कसे होता येते असा प्रश्न केलाय.

मग २२ ते २७ भगवंतांनी गुणातीताची लक्षणे सांगितली. प्रकाश (सत्वगुण) प्रवृत्ती (रजोगुण) प्रमाद (तमोगुण) हे उत्पन्न झाले असता जो त्यांचा द्वेष करीत नाही. आणि हे विकार नाहीसे झाले तर त्यांची इच्छा करीत नाही. तो कर्मफळाविषयी उदासीन असून त्रिगुणांनी विचलित होत नाही. गुणच गुणात वर्तत आहे हे जाणून तो स्थिर राहतो. चंचल होत नाही. त्याला सुख-दुःखे, मान, अपमान, माती-सोने सारखेच असते. प्रिय-अप्रिय, निंदा-स्तुती समसमान असते. तो धैर्याने युक्त आपल्या स्वरुपाचे ठिकाणी स्थिर असतो. शत्रु-मित्र त्याला सारखेच असतात. सर्व कर्मफळांची आसक्ती सोडणारा असा हा पुरुष त्याला गुणातीत म्हणतात. तसेच तो माझी निष्ठेने, भक्तीने सेवा करतो, उपासना करतो. तो त्रिगुणांच्या पैलपार ब्रह्मरुप व्हायला पात्र ठरतो. कारण अव्यय अविनाशी ब्रह्माचे, सनातन धर्मांचे, निरातिशय सुखाचे अधिष्ठान मीच परमात्मा आहे.

प्रकृती त्रिगुणात्मक असल्यामुळे ठराविक त्या त्या वयाला तो तो विकार उत्पन्न झाला. उदा. तारूण्यात संसार करावा धाटला. भूक लागली तर अलिप्ततेने साक्षीभावाने तो तो विकार शमवावा. ना त्यागावे ना भोगावे त्यापेक्षा अनुसरावे पण आसक्तीरहित अलिप्तपणे. इंद्रियावर ताबा ठेऊन. भूक लागली, जेवलो तर अन्नाचा विषय मनात रेंगाळत नाही. न जेवलो तरच तो रेंगाळतो. जेवताच अन्नाचा विसर पडतो. आपण आपल्या प्रकृतीचे बहर सर्व साक्षीभावाने बघावेत. अनैसर्गिक इंद्रियदमन करू नये. त्रिगुणामुळे विशिष्ट वयात ग्रंथी उद्दीपीत होतात. त्यावेळी अलिप्तपणे भोग भोगावा. तसेच विशिष्ट वयानंतर त्या ग्रंथीचे कार्य थांबेल तेव्हा कृत्रिम उपायांनी पुन्हा उत्तेजित करण्याच्या भरीस पडू नये. विकारांची भरती-आहोटी किनाऱ्यावर राहून साक्षीत्वाने जो पहातो तो गुणातीत झालाच समजावे. असे निसर्गाचे कौतुक जो साक्षीभावाने पाहू शकतो तो 'क्षेत्र' नाही 'क्षेत्रज्ञ' म्हणायला हवा. त्रिगुणांच्या क्रीडेकडे कौतुकाने पहावे हा साक्षीभाव वळला तर सुख दुःखे चटका देतात.

जो जीवनाकडे 'लीला' म्हणून पाहतो तो गुणातीत म्हणावा पण अर्जुना जीवनात केवळ साक्षीभाव असून चालत नाही तर माझी अव्यभिचारी भक्ती हवी. अव्यभिचारी भक्ती म्हणजे संपूर्ण विश्वाची एकात्मता जाणवणे. जो गुणांच्या पलिकडे जातो त्याला ईशभाव प्राप्त होतो. म्हणजे त्रिगुणांवर आपल्याच प्रकृतीवर आपली सत्ता चालणे. निसर्गावर (प्रकृतीवर) परमात्म्याची सत्ता चालते त्याप्रमाणे क्षेत्रावर माझी सत्ता चालली पाहिजे. भक्तीयोगाने माझी उपासना करणारी व्यक्ती माझ्या परब्रह्म प्राप्ती योग्य होते.

सत्वगुणाचा अहंकार कसा जिंकायचा? तर सत्वगुण हा सहजस्वभाव झाला तर त्याचे अप्रूप वाटणार नाही. सिंहाला शौर्याचा, सूर्याला तेजाचा, गुलाबाला सौंदर्याचा अभिमान कुठे असतो बरं ! प्रथम अहंकार जिंकावा मग आसक्ती. सातत्याने अहंकार जिंकावा. फलासक्ती तोडून ते फळही भगवंतास अर्पण करावे. म्हणजे आसक्ती जिंकता येईल. सत्वगुणी व्यक्तीसमोर सिद्धी व कीर्तीचे फळ येईल. ते फळ त्यागायचे. त्यागातला आनंद हा भोगापेक्षा मोठा असतो.

आत्मज्ञान मिळवण्यासाठी नुसते त्रिगुणातीत होऊन चालत नाही तर माझी अव्यभिचारी भक्ती म्हणजेच विश्वाची एकात्मता जाणणे आवश्यक आहे, असे ज्याला साधते तोच ही माया तरून जाऊ शकतो. अन्यथा नाही. सत्व-रज-तमातील ज्या गुणाचे प्राबल्य असेल त्याप्रमाणे पुढचा जन्म सुखाचा अथवा दुःखाचा भोग भोगल्यानंतर

स्वर्गलोक मनुष्य लोक वा नरक अशी अनुरुप गती मिळेल. हे त्रिगुण पुन्हा देहाच्या रुपाने त्या अज्ञानी जीवाला देह बंधनात घालतात. आत्मा मात्र या स्थितीतही मुक्त असतो. तो साक्षीत्वाने या गुणांकडे पाहून त्या गुणांच्या पलिकडे असलेले आपले स्वरूप जाणून मुक्त स्थितीचा अनुभव या देहातच घेतो.

अर्जुनाच्या निमित्ताने भगवंतानी साऱ्या मानवी जातीलाच १३ व १४ या अध्यायात सर्वश्रेष्ठ आत्मज्ञानाचे अमृत पाजले आहे. त्रिगुणात्मक प्रकृतीच्या लीलेकडे साक्षीत्वाने कसे पहावे याचे दिग्दर्शनही भगवंतानी मनापासून केले आहे. गुणातीत होणे म्हणजेच ब्रह्मतत्वाचा आनंद व अनुभव घेणे होय. गीतेने अनेक आदर्श व्यक्तीमत्वे आपल्यापुढे ठेवलेली आहेत ते आदर्श म्हणजे अध्यात्म विकसनाच्या पायऱ्या आहेत. स्थितप्रज्ञ, कर्मयोगी, संन्यासी, योगी, गुणातीत, ज्ञानी भक्त वगैरे. या अध्यायात भगवंतानी गुणातीताचा आदर्श सर्वांपुढे ठेवलाय. यानंतरच्या १५ व्या अध्यायात पुरुषोत्तम योगात अश्वत्थ वृक्षाच्या सत्व रज तम गुणांनी वाढलेल्या शाखा पर्ण भाराने युक्त व उर्ध्व मूळ असलेल्या विचीत्र अशा अनादि संसार वृक्षाचे वर्णन स्वतःच सुरु केले आहे.

आशा भिडे
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : २५४१०१४०

●●●

प्रा. मोहन पाठक
ग्रंथपाल
बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
ठाणे

सप्रेम नमस्कार

वास्तविक या आधीच आपण पाठवलेल्या अभिनंदनापर पत्राची पोंच द्यायला हवी होती. परंतु अनेक कार्यक्रमांमुळे उशिर झाला. आपण व्यक्त केलेल्या भावनांबद्दल आभार.

कधी भेट झाल्यास दिशासाठी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यायला सोपे जाईल.
पुनःश्च पत्राबद्दल धन्यवाद !

आपला
सदाशिव व. गोरक्षकर
माजी संचालक ,
प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालय, मुंबई



# उद्याचा विद्यार्थी

*'दिशा' नियतकालिकाने पूर्वी शिक्षकांकरिता एक निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेसाठी आलेला एक संग्रहातील निबंध - संपादक*

सातत्याने ज्ञानाचा ध्यास घेणारा विद्यार्थी, विद्येचा उपासक विद्यार्थी किंवा विद्या संपादन करणे ह्याच एका ध्येयाने प्रेरित होऊन व्यापक अशा ज्ञानसागरात पोहणारा मनस्वी हंस म्हणजे विद्यार्थी अशी पूर्वापार चालत आलेली विद्यार्थ्यांच्या बाबतीत असणारी आपली कल्पना सध्याच्या काळात हळूहळू बदलते आहे.

सद्य स्थितीत विद्यार्थी हा अभ्यासू, ज्ञानपिपासू न राहता फक्त परिक्षार्थी बनत आहे, हे दृश्य आपल्या डोळ्यादेखतच घडत आहे आणि त्याचा अनुभव, प्रत्यंतर घराघरातून येत आहे. गुरुंच्या किंवा शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत घेत स्वविचारांनी व स्वकौशल्याने अभ्यास करून परिक्षेत भरघोस यश मिळवून, गुणांचा उच्चांक गाठून गुणवत्ता यादीत झळकणारा विद्यार्थी म्हणजे खरा गुणी व परिपूर्ण विद्यार्थी अशी पालक, समाज यांची धारणा झाली आहे. कारण गुणांशिवाय विद्यार्थ्याला उच्च शिक्षण घेणे ही अशक्य बाब आहे. त्यामुळे आत्ताचा विद्यार्थी हा गुणग्राहक म्हणण्यापेक्षा गुणमापक झाला आहे, असा विचार वारंवार मनात येतो.

उद्याचा विद्यार्थी यापेक्षा वेगळा असेल अशी अपेक्षा बाळगणे, हे चूकीचे ठरणार नाही. कोणतीही व्यक्ती ही आजन्म एक विद्यार्थीच असते. वेगवेगळ्या जीवनानुभवातून अध्ययनाची प्रक्रिया ही त्या त्या व्यक्तीच्या नकळत अविरत चालू असते. परंतु विद्यार्थी म्हटला की आपल्या डोळ्यासमोर शाळा व महाविद्यालये यामध्ये शिकणारी मुलेच येतात.

बालवर्ग, शाळा आणि महाविद्यालय अशा शिक्षणातील पायऱ्या - सोपान चढत चढत जीवनाला सामोरे जाणारा उद्याचा विद्यार्थी. उद्याचा देशाचे भविष्य घडवणारा एक सक्षम नागरीक कसा असेल याचा विचार करताना आजच्या परिस्थितीचा विद्यार्थ्यांना होणारा फायदा उद्याच्या विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवेल, याची खात्री वाटते.

आजच्या काळात लागलेले नवनवीन शोध, विज्ञानाचे भान, नवीन तंत्राच्या वापराची कौशल्ये आत्मसात करत करत पुढे जाणारा आव्हाने स्विकारणारा विद्यार्थी आपल्या डोळ्यासमोर येतो.

फक्त पुस्तकी ज्ञान/विद्या एवढाच शिक्षणाचा उद्देश पुढल्या काळात राहणार नाही तर कला, क्रीडा, साहित्य अशा विविध क्षेत्रात आपले कौशल्य निपुणता सिद्ध करण्याची संधीही भावी पिढीला मिळणार आहे.

जीवनावश्यक शिक्षक मिळणे ही काळाची गरज आहे. हे लक्षात घेऊन तशा योजना साकार करणे ह्यासाठी सर्वच क्षेत्रात प्रयत्न चालू आहेत. जीवनानुभवातून शिक्षण घेणे निरीक्षण करून विचार करणे व आचरणात आणणे प्रत्यक्ष कृती करणे, असा वैविध्यपूर्ण अनुभव उद्याच्या बालकाला मिळणार आहे.

दृकश्राव्य साधने, संगणक या भविष्यात उपयोगी पडणाऱ्या शैक्षणिक साधनांचा अभ्यास मुले बालवयातच करू लागली आहेत. बालवयातील या मुलांची बौद्धिक प्रगती ही अतिशय गतिमान आहे.

मारुतीने सूर्याकडे झेप घेऊन तो प्रचंड अग्नीचा गोळा पकडण्यासाठी प्रयत्न केला ही गोष्ट आपण सर्वांनी ऐकलेली आहे. उद्याचा विद्यार्थीही संशोधन करून अंतराळयानातून प्रत्येक ग्रहावर पाय ठेवल्याशिवाय परतणार नाही. आताच बालसंशोधकांचं एक पथक मंगळावर जाऊन संशोधनासाठी तयार अशी बातमी आपण वर्तमानपत्रातून वाचली आहे.

विद्यार्थ्यांच्या गतीशील प्रगतीला योग्य दिशा मिळण्यासाठी सर्व सुविधांनी युक्त शाळा, शैक्षणिक साधने, शिक्षणात दृकश्राव्य साधनांचा वापर, कृतीशील शिक्षण यामुळे उद्याच्या विद्यार्थ्यांना अनुभवातून आनंददायी शिक्षण मिळणार आहे.

साहित्य क्षेत्रातही उद्याच्या विद्यार्थ्याला प्रगती करता येण्यासारखे वातावरण सर्वत्र आहे. शाळेत किंवा सुसज्ज वाचनालयांमुळे साहित्याचे ग्रंथभांडारच विद्यार्थ्यांना खुले झाले आहे. वाचन, मनन, लेखन करणे अतिशय सुलभ झाले आहे. सुसज्ज अशा ग्रंथसंग्रहालयांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडणार आहे.

मिळणाऱ्या सुविधांचा योग्य उपयोग करून आपली प्रगती करून घेणे सहज शक्य आहे. प्रत्येक गोष्टीला नाण्याप्रमाणे दोन बाजू असतात. 'उद्याचा विद्यार्थी' लक्षात घेता आपण दुसरी बाजूही लक्षात घेतली पाहिजे.

उद्याच्या विद्यार्थ्यांना जागरूक पालकांमुळे, सुसज्ज शिक्षणसंस्थांमुळे सर्वच गोष्टी, शिक्षणातील सर्वच सुविधांचा लाभ अगदी सहज होणार आहे. त्या मिळवण्यासाठी कष्ट, श्रम करावे लागत नाहीत. त्यामुळे श्रमांचं महत्त्व कळेलच याची शक्यता कमी वाटते.



रात्रंदिवस जागून लेखन-वाचन करणे, यांचीही गरज उद्याच्या विद्यार्थ्याला भासणार नाही. कारण 'फास्ट-फूड' प्रमाणेच अभ्यासपयोगी सर्व सामग्री विद्यार्थ्यांच्या हाती पडत आहे. अपेक्षित प्रश्नसंच, आदर्श उत्तरे, ध्वनिफिती, दूरदर्शनवर शैक्षणिक कार्यक्रमांतून मार्गदर्शन, शिक्षणात संगणकाचा वापर, या सगळ्या बाबींमुळे श्रम कमी केले, तरी पाहिजे ते मिळवता येते ही उद्याच्या विद्यार्थ्यांची धारणा होणारच, यात आश्चर्य नाही.

सर्व गोष्टी सहज मिळत गेल्याने श्रमप्रतिष्ठेचा अभाव निर्माण होईल व विद्यार्थी सहज, कमी कष्टाने मिळणाऱ्या गोष्टींचाच विचार करत राहिल.

अजूनही एक विचार उद्याच्या विद्यार्थ्यांबाबत मनात डोकवतो तो म्हणजे शहरी विद्यार्थी व ग्रामीण भागात शिक्षण घेणारा विद्यार्थी, खेड्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील सुविधांच्या अभावातच आपले शिक्षण पूर्ण करावे लागते. गावात शिक्षणाची सोय नाही म्हणून घरापासून लांबच्या शाळेतही शिकावे लागते. काही मुलांना घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून शिकावे लागते.

त्यामुळे खेड्यात शिकणारा उद्याचा विद्यार्थी शालेय अभ्यासक्रमात, पुस्तकी ज्ञानात, गुणमापनात थोडा मागे असेल परंतु जीवनाच्या शाळेत हा विद्यार्थी पुढे असेल अशी खात्री वाटते.

शहरात उपलब्ध असणारे क्लासेस, ग्रंथसंग्रहालये, विज्ञान-प्रयोगशाळा, दृकश्राव्यसाधने यांचा लाभ ग्रामीण विद्यार्थ्याला मिळेलच असे निश्चितपणे सांगता येत नाही पण निसर्गाची प्रयोगशाळा मात्र त्यांच्यासाठी सदैव खुली असते. त्यातून तो अनेक सत्य शिकत, पाहत असतो.

हा विद्यार्थी संस्कारांच्या दृष्टीने भाग्यवान ठरतो. गावातील देवळे, तिथे होणारे भजन कितनासारखे मन संस्कारक्षम करणारे कार्यक्रम या मुलाला बरच काही शिकवतात. गावातील वृद्ध माणस, एकत्र कुटुंबपद्धती, शेजारधर्म, या सगळ्यांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडत असतो. उद्याचा विद्यार्थी सुसंस्कारीत मनाचा होण्यासाठी या सगळ्याची नक्कीच मदत होते. त्यासाठी वेगळे संस्कारवर्ग किंवा शिबीर घेण्याची गरज भासत नाही.

उद्याचा विद्यार्थी विद्येचा उपासक सुसंस्कारित मन असणारा आदर्श व तितकाच नम्र असावा, असं आज प्रत्येकालाच वाटत आहे पण असा विद्यार्थी तयार होण्यासाठी कोणते प्रयत्न करायला हवेत, याचा विचारही होणे आत्ताच्या काळात अत्यावश्यक आहे.

शालेय अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण हा विषय लादून किंवा सुट्टीमध्ये संस्कार वर्ग घेऊन उद्याचा विद्यार्थी पूर्णत: सुसंस्कारीत मन असणारा होईलच असे नाही तर त्यासाठी घर, समाज, शाळा ह्या सर्वांकडून प्रयत्न होणे गरजेचे झाले आहे.

जिच्या हाती पाळण्याची दोरी
ती जगाचा उद्धार करी ॥

हे संतवचन आपण वारंवार वाचले व ऐकले आहे. त्यातली सत्यता आपल्या मनाला खचितच पटते. पण बालकाच्या मनावर त्याच्या अतिशय जवळ राहून संस्कार करणाऱ्या ह्या मातेलाच आता काळाची गरज म्हणून आपल्या लहानग्याला ठेवून घराबाहेर जावे लागते. त्यामुळे उद्याचा हा विद्यार्थी मातृसहवासातील खऱ्या संस्कारांना पारखा झाला आहे.

विभक्त कुटुंबपद्धतीमुळे नातवंडांना गोष्टी सांगून, सांजवेळी शुभंकरोती, श्लोक म्हणून घेणारे आजी-आजोबाही घरात नसतात. घरातून संस्कार होणं ही अशक्य झाले आहे. म्हणूनच शासनाला मूल्यशिक्षणासारखा अनौपचारीक शिक्षण विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा लागतो आहे.

उद्याचा विद्यार्थी आदर्श विद्यार्थी असावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे अत्यावश्यक वाटते.

उद्याचा विद्यार्थी म्हणजेच भावी पिढी, उद्याचा भावी नागरीक आहे, हे लक्षात घेऊन उद्याचा विद्यार्थी सुशील, नम्र, आदर्श व्यक्ती बनण्यासाठी चांगले-वाईट, खरे-खोटे याची जाणीव करून द्यायला हवी.

या सगळ्यासाठी विद्यार्थ्यांत वाचनाची आवड निर्माण करणे गरजेचे आहे. दृकश्राव्य साधनांच्या अति वापरामुळे विद्यार्थ्यांच्यात अभ्यासू वृत्ती कमी होत आहे, असे दिसून येते. मुलाचं मन संस्कारक्षम होण्यासाठी लेखक प्रा. मा. श्री. प्रवीण दवणे यांच्या 'सावर रे' सारखे लेख विद्यार्थ्यांनी मुद्दाम वाचायला लावले पाहिजेत, काय वाचावे याबाबत मार्गदर्शन घरी व शाळेत दोन्हीकडे करणे गरजेचे आहे. काय पाहावं काय पाहू नये, चांगले काय? वाईट काय? याचा विचार विद्यार्थ्यांना करायला लावणे हे शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाचे आहे.

उद्याचा विद्यार्थी, सुसंस्कारीत कार्यक्षम, आदर्श विद्यार्थी बनावा यासाठी नवनवीन उपक्रम घेणे, कला, क्रीडा व साहित्यात हा विद्यार्थी कसा यशस्वी होईल याकडे लक्ष देणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे हे कधीही विसरून चालणार नाही.

सौ. वैदेही अतुल गांगल
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
प्राथमिक विभाग.

●●●

# परिसर वार्ता

परिसर वार्तासाठी परिसरातील (व नौपाड्यातीलही) विद्या प्रसारक मंडळाच्या संस्थांनी घडणाऱ्या लहान-मोठ्या घटना (नियुक्ती, निवृत्तीसह) 'दिशा'ला कळवाव्यात, अशी आवाहने करूनही प्रतिसाद मिळत नाही, ही खंत आहे. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या 'पराधीन सरस्वती' या लेखात वेगळ्या संदर्भात, ''आमच्याकडे Documentation नाही, त्यामुळे कार्यक्रम होतात, भाषणे होतात व सरस्वतीचा आविष्कार विरुनच जातो. त्याला शब्दबद्ध करण्याचा आम्ही कंटाळा करतो व पर्यायाने आपल्याच भविष्यातील नुकसान करतो.'' असे विचार मांडले होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या विविध संस्थातून होणाऱ्या कार्यक्रमांची परिसर वार्तातून नोंद झाली नाही, तर आपल्याच भविष्यातले ते आपले नुकसान असेल. तेव्हा आपण सेवेत नसूही, पण आज या शिक्षण सेवेतून समाजाचे आपण काही देणे लागतो आहोत ते या सदरातील अनुपस्थितीपुढे आपण गमावून बसलो आहोत. भविष्यात दिशाचे अंक 'पूर्वी काय झाले' याचा शोध घेण्यासाठी पाहिले जातील.

त्यासाठी पुनश्च सर्व संस्थाप्रमुख कार्यक्रम प्रमुख यांना आपल्या परिसरात काय घडते याची 'छायाचित्रांसह' नोंद 'दिशा'साठी पाठवा, अशी विनंती आहे. लिहून ठेवलेला इतिहास आणि अलिखित इतिहास यात लिखीत इतिहास अधिक महत्त्वाचा असतो, तोच भविष्यकाळ प्रकाशित करीत जातो.

तेव्हा पुन्हा पुन्हा विनंती !!

## जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या नागरी संरक्षण दलाचे उद्घाटन

जोशी-बेडेकर महाविद्यालयातील नागरी संरक्षण दल युनिट क्र. एस.एस.सी.डी.यु. क्र. १०१० चे उद्घाटन मंगळवार १ एप्रिल रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या कक्ष क्र. अ-०७ मध्ये विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर व नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक सुधाकर वस्ते यांच्या हस्ते करण्यात आले.

'मला सुदृढ स्वयंसेवक म्हणून भरती करून घ्या' असे आवेशपूर्ण उद्गार विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चिरतरुण डॉ. वा.ना.बेडेकर यांनी उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना काढले.

